

# फुलबाग

इंदुकान्त

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ५५७
REFBK-0005501

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. काव्य नं. ११३८
ता. १८।५३८
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
७३७८

# फुलबाग

कवि — इन्दुकान्त

( श्री. जनार्दन श्रीधर नाईक, बी. ए., एल्‌एल्., बी., ॲड्व्होकेट )

याचा

काव्यसंग्रह

REFBK-0005501

प्रथमावृत्ति

१४ जानेवारी १९३६

किंमत १ रुपया

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी,
८५४ सदाशिव, पेठ पुणें २.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. ]

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीचा छापखाना,
५१३ शनवार, पुणें २.

# फाटकापाशीं

पुण्यांतील एक विद्वान्, तरुण व साहित्यप्रेमी वकील श्री. जनार्दन श्रीधर नाईक, बी. ए., एल्एल्. बी, हे 'इन्दुकान्त' या टोपणनांवानें कविता लिहितात व त्यांच्या कविता निरनिराळ्या मराठी नियतकालिकांमधून प्रसिद्ध होत असतात, ही गोष्ट मला स्वतःला बरींच वर्षे माहीत आहे. त्यांच्या निवडक काव्यांचा हा संग्रह आज 'फुलबाग' या नांवानें प्रथम प्रसिद्ध होत आहे. या 'फुलबागे'ची शोभा मराठी कवितेच्या वाचकांना दर्शविण्याचें काम त्यांनीं मोठ्या प्रेमानें मजकडे सोपविलेलें आहे. 'फुलबाग' म्हणजे कांहीं 'पदार्थवस्तुसंग्रहालय' नव्हे, कीं त्यांतील प्रत्येक वस्तूचा सांगोपांग इतिहास एकाद्या माहितगार माणसानें नवख्या जिज्ञासूंना सांगावयास हवा. फुलांचा सुगंध व सौंदर्य कोणालाही स्वतःच्या परीक्षेनें पडताळून बघतां येण्यासारखें आहे. किंबहुना, त्याशिवाय त्यांचा आल्हाद मनाला प्रतीत होऊंच शकणार नाहीं. तथापि, बागेंत शिरण्यापूर्वी एकादा दुसरा वाचक जर फाटकापाशीं घोटाळला, तर तेवढ्या वेळांत त्याच्या कानांशीं थोडीशी कुजबुज करतां येणें शक्य आहे, आणि तेंच काम मी या ठिकाणीं करणार आहें. एकदम सरळ 'बागेंत' शिरणाऱ्या वाचकांनीं ही कानगोष्ट मुद्दाम कान दीर्घ करून ऐकण्याचें अर्थातच कारण नाहीं !

'इन्दुकान्तां'नीं आपल्या काव्यसंग्रहाला दिलेलें 'फुलबाग' हें नांव फारच समर्पक आहे. कारण त्या नांवावरून त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वाचकांना सहज कळून येण्यासारखा आहे. 'प्रौढत्वीं निजशैशवास जपणें बाणा कवीचा असे' असें 'केशवसुतां'नीं म्हटलें आहे. हा बाणा इन्दुकान्तांनीं आपल्या काव्यांत अतिशय तल्लीनतेनें पाळलेला आहे. त्यांची मनोवृत्ति एकाद्या शिशूप्रमाणें आनंदी, खेळकर व नाचती–बागडती आहे. फुलांफुलांतून त्यांना नाचावेंसें वाटतें. हिरव्यागार कुरणांमधून त्यांना हुदडावेंसें वाटतें. सोनेरी सूर्यकिरणें गोळा करावींत, दंवाचे टपोरे थेंब अलगत उचलून घ्यावेत, झिमझिम पावसांत स्वतःभोंवतीं गरगर नाचावें, चांदण्या रात्रीं फुलांच्या ताटव्यांतून धांगडधिंगा घालावा, याचें त्यांना भारी

वेड आहे. आकाशांत चंद्र पाहिला, कीं त्यांची कल्पना एकाद्या अल्लड बालिकेप्रमाणें थय्‌थय् नाचूं लागते.

गगनोद्यानीं पुष्प विकसलें का हें कल्पलतेचें,
कीं विश्वाच्या चैतन्याचें निधान मांगल्याचें !
मोहक, मंगल आणि दिव्य जें खुलवी या भूभागा
एकवटे कीं एके ठायीं त्याची ही रसगंगा !

(पान १७)

असें त्यांना वाटूं लागतें. सूर्याचें आरक्त बिंब दृष्टीस पडलें कीं,

गगनाच्या पाळण्यांत निजला करकरुनी चाळा,
जागा होउनि पाही आतां विश्वाचा चाळा !
शेषाच्या मस्तकांत विलसे मणि जो तेजांत
काय पडे ही छाया त्याची वरच्या दर्यांत ?

(पान १९)

असा मनोहर संभ्रम त्यांच्या मनाला पडतो. आकाशांतील चांदण्या पाहून

चेतना नळींतुनी,
उडविले नभीं कुणी
मोहफेंस बुडवुडे सहज काय एवढे ?

(पान ५७)

अशा अद्भुत कल्पना त्यांच्या मनांत नाचूं लागतात. सौंदर्याचा त्यांना जबरदस्त हव्यास आहे.

सौंदर्यें खुलला जीव,
सौंदर्यें झुलला जीव.
सौंदर्यें जागोजाग
विश्वाची फुलली बाग,
वर खालीं इकडे तिकडे
विश्वहृदयिं सौंदर्य दडे,
वृक्षवल्लरी शैलशिळा,

स्थल प्रत

गातीं तीं सौंदर्याला
फुलें, पांखरें, जललहरी
सौंदर्यें नटलीं सारीं

( पान ३६ )

अशा तऱ्हेनें आपल्या भोंवतालची प्रत्येक वस्तु सौंदर्यानें भरलेली आहे, अशी त्यांना जाणीव आहे. हें दिव्य सौंदर्य त्यांना जागेपणींच काय, पण स्वप्नांतसुद्धां भासमान होतें; आणि--

दिव्यत्वरसीं मन गुंगविणें हेंच खरें जगणें !

( पान ६८ )

अशी जीवनासंबंधीं त्यांची अत्यंत उदात्त मनोहर कल्पना आहे. अशा तऱ्हेनें जगाकडे पाहण्याची 'इन्दुकान्तां'ची दृष्टि एकाद्या बाळसेदार व गोंडस बालकाप्रमाणें आल्हाददायक व उल्हासपूर्ण आहे, म्हणून त्यांच्या या 'फुलबागें'तील प्रत्येक फुलाफुलावर व पानापानावर ताजेपणाची व प्रसन्नतेची टवटवी दृष्टीस पडते. जग ही एक सौंदर्याची फुलबाग आहे एवढी एकच त्यांना जाणीव आहे; आणि म्हणून फुलें, तारा, दंवबिंदु, तुषार, संगीत इत्यादि जगांतील सौंदर्यें बघूनच त्यांचें मन नाचूं, बागडूं, गाऊं लागतें. या फुलबागेच्या बाहेरून जाणाऱ्या जगाच्या कंटाळवाण्या रहदारीचा गलबला या 'फुलबागें'त यत्किंचित्‌ही ऐकूं येत नाहीं--त्या रस्त्यावर प्रतिक्षणीं उठणाऱ्या धुळीच्या लाटांची मलीन छाया या 'फुलबागे'वर कोठेंही पडलेली नाहीं—या 'फुलबागें'त क्षणभर विसांव्यासाठीं शिरणाऱ्या वाचकाला जगाच्या जंजाळाची विस्मृति पडेल व त्याला आपण कोठल्यातरी परींच्या अद्भुत विलासोद्यानांत शिरलों आहोंत कीं काय असें वाटल्यावांचून राहणार नाहीं.

तथापि, बागेंत जाणारी सारीच मंडळी कांहीं तेथील शोभा पहावयाला जात नाहींत. चिवडा खावयाला व चकाट्या पिटावयाला आरामशीर जागा मिळावी या हेतूनेंही पुष्कळसे लोक बागेंत प्रविष्ट होतात. (कांहीं मंडळी बागेंत शिरून झोंपाही काढतात.) प्रस्तुतच्या बागेंत शिरणारे कांहीं विचक्षण वाचक कदाचित् असाही प्रश्न विचारतील कीं, 'इन्दुकान्तां'च्या दुनियेंत तारा, फुलें, चंद्र, सूर्य, याशिवाय दुसरें कांहीं

दृष्टीसच पडत नाहीं यावरून 'इन्दुकान्त' हे जमिनीवर राहतात, कीं ढगावर अधांतरीं राहतात? त्यांच्या आजूबाजूला रक्तामांसाचे हसणारे, रडणारे, कुढणारे, भांडणारे कांहीं मनुष्य नांवाचे प्राणी राहतात, याचा त्यांना पत्ता आहे किंवा नाहीं? असें तर्कट चालविणाऱ्या वाचकांना कवीनें उत्तर दिलेलें आहे

निसर्गहृदयामधीं सतत जी घडामोड चाले,
काव्यदुर्बिणीमधुनी त्याचे बघणें नव चाळे !

( पान ६१ )

निसर्गाचीं सौंदर्यें काव्याच्या दुर्बिणीमधून बघणें हें या कवीचें ध्येय आहे, याकडे वाचकांनीं डोळेझांक करूं नये. काव्याला दुर्बिणीची उपमा कवींनीं दिलेली आहे हें योग्यच आहे. दुर्बिणीच्या एका बाजूनें पाहिलें तर हजारों मैल अंतरावरच्या गोष्टी एका हातावर आहेत असें दिसतें, तर दुसऱ्या बाजूनें बघितलें तर हाताजवळच्या गोष्टी लांब अंतरावर आहेत असें भासतें. भोंवतालच्या परिस्थितीकडे पाहतांना व आकाशांतील ग्रहगोलांकडे बघतांना 'इन्दुकान्त' आपल्या काव्य-दुर्बिणीचीं कोणतीं टोंकें वापरीत असावेत हें यावरून कळून येण्यासारखें आहे.

समतेची, नवनीतीची
तात्त्विकतेच्या ढोंगाची
आणि कलाजीवन याची
पुरे करा पोपटपंची !
गरिबजनाचीं मजुरांचीं
गाणिं ठराविक सांच्याचीं
गाऊं नका; किंवा धनिकां
शिव्याशापही देउं नका
सत्य त्यांत अर्धेंच असे !
पूर्ण सत्य वेगळें असे

( पान ९९ )

हे कवीचे उद्गार वाचून साहित्यांत अलीकडे शिरूं लागलेले 'बोडखे लालडगलेवाले' अधिकच लाल होण्याचा संभव असला तरी प्रस्तुत

कवीनें धारण केलेली ही वृत्ति अज्ञानमूलक नसून हेतुपूर्ण आहे; म्हणून केवळ निसर्गामधील सौंदर्य व दिव्यत्व हुडकून काढण्यांत गढून गेलेली या कवीची दृष्टि बिघडलेली आहे असा आक्षेप मी तरी घेणार नाहीं.

एखाद्याच्या घरीं आमंत्रणावरून जेवावयाला जाणाऱ्या इसमानें 'तुम्हीं आज अमुकच पक्वान्न कां केलें नाहीं ?' अशी यजमानाजवळ विचक्षणा करणें हें जितकें गांवढळपणाचें आहे तितकेंच 'तुम्हीं अमुकअमुक तऱ्हेचीं काव्यें कां लिहीत नाहीं ?' अशा प्रश्नानें एखाद्या कवीला छेडणें हें देखील असमंजसपणाचें आहे. वाङ्मय म्हणजे कांहीं खाणावळ नव्हे, कीं जिथें शिरून पैसे फेकले कीं आपल्याला रुचेल तो पदार्थ खाणावळवाल्याकडून तयार करवून घेतां येतो. 'राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशा तऱ्हेचें धष्टपुष्ट वाङ्मय निर्माण व्हावयाला पाहिजे' अशा तऱ्हेची ओरड कांहीं मठ्ठ भोजनभाऊ आजकाल करीत आहेत. हीच जर दृष्टि आयुष्यांत बाळगली तर संसारांत स्वयंपाकघर आणि तालमीचे आखाडे यांशिवाय दुसरें कांहींही उरणार नाहीं. राष्ट्रीय कर्तव्यापेक्षां जीवनविषयक कर्तव्य अधिक महत्त्वाचें आहे. केवळ गामा आणि कल्लू तयार करण्यापेक्षां वाङ्मयाचें ध्येय कितीतरी अधिक व्यापक आहे. मनुष्य हा केवळ रक्तमांसानें किंवा स्नायूंनीं जगत नाहीं; ज्ञानाचें भारूड मेंदूंत कोंबूनही आयुष्याचें सार्थक होत नाहीं; सौंदर्यदृष्टि जागृत झाली नसेल तर जीवनांत उल्हास व आनंद आणतां येणार नाहीं व जीवन निरर्थक होईल. 'फुलबागे'ला म्हणूनच आयुष्यांत समंजस माणसांनीं स्थान दिलेलें आहे.

इन्दुकान्तांची कविता वाचतांना आपण एखाद्या काल्पनिक ( Make-believe ) सृष्टीमध्यें वावरतों आहोंत असें वाटतें व बाह्य जगाचा आपणाला क्षणैक विसर पडतो. जाणिवेचें जड दडपण मनावरून अलगत उचलण्याचें काम त्यांचें काव्य यशस्वीपणें करतें आणि यांतच त्यांच्या काव्याचें खरें सामर्थ्य आहे. कै. बालकवि ठोमरे यांच्या काव्याशीं परिचित असणाऱ्या वाचकांना इन्दुकान्तांच्या 'फुलबागें'तून फिरतांना पुष्कळच ओळखीचीं स्थळें आढळतील. बालकवींच्या बऱ्याच कल्पनांचा पडसाद इन्दुकान्तांच्या काव्यांत ऐकूं येत असला तरी दोघांच्या मनोवृत्तींत असलेला पुष्कळसा सारखेपणा हा या अनुकरणाच्या मोहाच्या मुळाशीं आहे असें वाटतें. 'बालकवीं'प्रमाणेंच इन्दुकान्तांना पुष्कळ वेळां नैराश्याचे व गूढगुंजनाचे झटके येत असलेले दिसून

येतात. फुलांफुलांवरून उडणाऱ्या एकाद्या आनंदी व स्वच्छंदी फुलपांखरानें एकाद्या फुलावर संथपणें बसावें व आपल्या चिमुकल्या पायानें डोकें खाजवून जीवितासंबंधीं गंभीर विचार करावयाला लागावें तसें कित्येक वेळां इन्दुकान्त करतात. 'फुलचाला' ही त्यांची दीर्घ कविता या त्यांच्या वृत्तीचें प्रतीक म्हणून दाखवितां येईल. एका बागेंत कारंज्याजवळ एका वेलीवर एक चिमुकली फुलचाला राहत होती. या 'फुलचाले'चें कवींनीं चितारलेलें 'टाइम-टेबल' फारच मनोरंजक आहे.

कारंज्याचें तुषारपाणी सांडे जें खालीं,
जमिनीवरती स्वच्छ तयाचा झरा बने जवळी.
त्याच झऱ्याच्या आरशांत ती वेणिफणी करुनी
घेइ थंडसें कारंज्याचें अंग धुण्या पाणी !
अंग धुवोनी झाल्यावरती वेळ तिचा कांहीं
विश्वामधलीं गूढ रहस्यें उकलण्यांत जाई.
नाजुक गाणीं स्वैरपणें मनिं गुणगुणुनी कांहीं
स्वच्छ झऱ्याच्या रुचकरशा त्या पाण्यावर राही.
झोंप जराशी घेउनि नंतर वाऱ्याच्या संगें
अध्यात्मज्ञानाच्या दैविक विचारांत रंगे.

(पान ६१)

वेणीफणी करून व नुसतें झऱ्याचें पाणी पिऊन विश्वामधलीं गूढ रहस्यें उकलणारी किंवा 'अध्यात्मज्ञानाची चर्चा' वाऱ्याबरोबर करणारी ही फुलचाला बागेंत राहण्यापेक्षा महात्मा गांधींच्या आश्रमांत मिराबेनच्या ऐवजीं राहवयाला पाहिजे असें वाटतें. या कवितेंत कवीनें व्यक्त केलेलें जीवितविषयक तत्त्वज्ञान जरी उत्तम असलें तरी तें त्यांनीं 'फुलचाले'च्या नाजुक माथीं मारण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्याप्रमाणेंच कवीची गूढगुंजन प्रवृत्ति ही त्यांच्या तरल व कोमल कल्पनाशक्तीशीं विसंगत अशी आहे. 'अज्ञेयाचा खेळगड्याशीं' खेळावें, 'चिरंतनाच्या हिंदोळ्यावर' झोंके घ्यावे, 'चैतन्याच्या वाजीवर बसून ब्रह्मांडाचें अखेरचें टोंक गांठावें' म्हणजे काय ? आत्मप्रत्ययाच्या अभावीं ही निवळ शब्दाची कठोर कसरत आहे

असें वाटतें! आधुनिक मराठी कवितेला ही तत्त्वज्ञानाची पेडवेणी किंवा या जाडजूड शब्दांच्या गोठपाटल्या फारशा झेपण्यासारखा नाहींत हें इन्दुकान्तांनीं लक्षांत ठेवावें.

बालकवीप्रमाणेंच गोविंदाग्रजांच्या काव्याचीही दाट छाया इन्दुकान्तांच्या काव्यावर पडलेली दिसते. 'प्रेम आणि मरण' (पान ५५) ही कविता पहा. गोविंदाग्रजांच्या याच मथळयाच्या कवितेंत एक वृक्ष विद्युल्लतेच्या प्रेमपाशांत पडलेला आहे, तर इन्दुकान्तांच्या या कवितेंत मेघ हा विद्युल्लतेच्या प्रेमानें वेडा झालेला आहे. या कल्पनेंत शास्त्रीय सत्याचा कवीनें घोटाळा केलेला आहे. आगकाडीनें प्रकाशाच्या प्रेमांत पडावें तसलाच हा प्रकार आहे. बरें, विद्युल्लता ही मेघाला जेव्हां 'कडकडून' भेटली तेव्हां मेघ मरतां मरतां पांच सात ओळी मजकूर बोललेला आहे. विद्युल्लतेच्या स्पर्शानें येणाऱ्या मरणाची कवीला कल्पना दिसत नाहीं. हें मरण म्हणजे गात गात मरणाऱ्या नाटकांतील नायकाचें मरण नव्हे. 'Death by Electrocution' याबद्दल कवींनीं माहिती मिळविणें जरूर आहे. त्याप्रमाणें 'हृदयाचें गीत' (पान ७२) पहा

"मानस-मैने, गाच गडे तूं-'हृदयाचें गीत!'
करतील पंचप्राण तुला बघ अंतरिंची साथ!

या इन्दुकान्तांच्या पहिल्या दोन ओळी वाचून 'गोविंदाग्रजां'च्या 'प्रेमपाठा'च्या सुरवातीच्या दोन ओळींची एकदम आठवण होते.

'चित्तकोकिळा, प्रेमें गाया जगद्रायनाला,
पंचप्राणांचा पंचम तव लावि याच काला?'

प्रस्तुत कवितेंत एका काल्पनिक वल्लभेची कवीनें प्रणयाराधना केली आहे; पण ती करतांना 'गोविंदाग्र'जांनीं केलेल्या चुकांचीच इन्दुकान्तांनीं पुनरावृत्ति केलेली आहे. नुसत्या शब्दांच्या चंद्रज्योती जाळल्यानें किंवा उत्प्रेक्षांचे भुइनळे उडवल्यानें प्रेमाची दिवाळी साजरी होत नाहीं. एकाद्या वल्लभेचें मन आकर्षित करण्यासाठीं तिच्या प्रियकरानें जरीची टोपी व टिकल्यांनीं चमचमणारा भरजरी अंगरखा घालून जाण्यासारखेंच हें हास्यास्पद आहे. प्रेम व्यक्त करण्यास श्रीमंत पोषाखापेक्षां प्रेमळ हृदयाची जास्त आवश्यकता असते.

सुधास्यंदिनी चंद्रकला तूं चित्तचकोराची
जगन्मोहिनी राजस राणी हृद्ब्रह्मांडाची

( पान ७५ )

असें म्हटल्यानें कोणतीही सामान्य मगदुराची 'प्रिया' वश होऊं शकणार नाहीं. सगळी कविता ऐकून घेतल्यानंतर ती शांतपणें कवीला विचारील, कीं "हें सारें झालें, पण तुमचें माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं तें आधीं सांगा!" हा दोष केवळ इन्दुकान्तांच्या पुरता आहे असें नाहीं, तर 'गोविंदाग्रजां'च्या कृत्रिम प्रेमकाव्याचें अनुकरण करण्याऱ्या पुष्कळशा कवींमध्यें तो प्रकर्षानें आढळून येतो.

इन्दुकान्तांची भाषा सोपी, सरळ व सुंदर आहे. त्यांची वर्णनशैलीही आकर्षक व मनोहर आहे.

नलिनीराणी नयनीं आणी
पाणी प्रेमाचें विमल,
गाउनि गाणीं मंजुळवाणीं
फुलवी जीवाचें फूल.
सुहास्यलहरी तिचिया अधरीं
करिती लीला प्रेमाची,
गोंडस गालीं राजस लाली
विलसे नाजुक प्रीतीची.
परि करमेना, जीव रमेना
नाजुक नलिनीबाळेचा,
ध्यास लागला एक जिवाला—
काल्पित प्रियकर प्रतिचा !

हें वर्णन खरोखरच हृदयंगम आहे,

या कळ्या उमलल्या जीवनवेलीवरल्या—
फुलवाया बागा तुझ्या जीवनामधल्या !
घेतील हातिं कुणि पायदळीं जरि पडल्या

कुणि देतिल फेकुनि हुंगुनि पडल्या पडल्या
क्षिति नसे जगाच्या स्तुतिनिंदेची त्यांना
फुलतात भुलुनि तव नयनींच्या किरणांना !
  तूं येतां त्यांचीं पानें—हालती !
  तूं बघतां त्यांतुनि सुमनें—उगवती.
  दशदिशांस निजगंधानें—भारती !
कापूसपुंजका हले जसा झुळुकेनें !
कळिकळी, वेल तशि हले तुझ्या स्पर्शानें !

(पान १०१)

या ओळींतील हळुवार नाजुकपणा कोणाच्याही हृदयाच्या तारा क्षणमात्र कंपित केल्याविना राहणार नाहीं.

इन्दुकान्तांच्या बहुतेक सर्व काव्यांत सुंदर शब्दांची पखरण पसरलेली दिसते. तथापि त्याबरोबर हेंहि त्यांच्या निदर्शनाला आणून देणें जरूर आहे, कीं कित्येक ठिकाणची त्यांची गद्य कर्णकटु शब्दयोजना, कल्पनाविसंगति व ढोबळ वृत्तरचना, हे दोष वाचकांना चांगलेच जाचल्याखेरीज राहणार नाहींत.

'भोंती' 'भरजारी,' 'विरालें,' 'सुंदरतासोनुकलें', 'भविष्यता', 'प्रीतइंगीत' हे शब्द नमुन्यादाखल देतां येण्यासारखे आहेत.

स्पर्शसुखाला ज्यांनिं मुकाविलें सहा कोटिजीव,
शिकावयाला त्यांनिं नको का उज्ज्वल हें तत्त्व ?

(पान २१)

ही तव इच्छाही फुकट
सोडुनि दे तूं हें वेड !

(पान २७)

सोडिल्या कां अणी कोणी
विषारी नाग-नागीणी !

(गझल पान ३१)

सुधास्यंदिनी चंद्रकला तूं चित्तचकोराची
जगन्मोहिनी राजस राणी हृद्ब्रह्मांडाची
( पान ७५ )

असें म्हटल्यानें कोणतीही सामान्य मगदुराची 'प्रिया' वश होऊं शकणार नाहीं. सगळी कविता ऐकून घेतल्यानंतर ती शांतपणें कवीला विचारील, कीं " हें सारें झालें, पण तुमचें माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं तें आधीं सांगा !" हा दोष केवळ इन्दुकान्तांच्या पुरता आहे असें नाहीं, तर 'गोविंदाग्रजां'च्या कृत्रिम प्रेमकाव्याचें अनुकरण करण्याऱ्या पुष्कळशा कवींमध्यें तो प्रकर्षानें आढळून येतो.

इन्दुकान्तांची भाषा सोपी, सरळ व सुंदर आहे. त्यांची वर्णनशैलीही आकर्षक व मनोहर आहे.

नलिनीराणी नयनीं आणी
पाणी प्रेमाचें विमल,
गाउनि गाणीं मंजुळवाणीं
फुलवी जीवाचें फूल.
सुहास्यलहरी तिचिया अधरीं
करिती लीला प्रेमाची,
गोंडस गालीं राजस लाली
विलसे नाजुक प्रीतीची.
परि करमेना, जीव रमेना
नाजुक नलिनीबाळेचा,
ध्यास लागला एक जिवाला—
काल्पित प्रियकर प्रतिचा !

हें वर्णन खरोखरच हृदयंगम आहे,

या कळ्या उमलल्या जीवनवेलीवरल्या—
फुलवाया बागा तुझ्या जीवनामधल्या !
घेतील हातिं कुणि पायदळीं जरि पडल्या

कुणि देतिल फेकुनि हुंगुनि पडल्या पडल्या
क्षिति नसे जगाच्या स्तुतिनिंदेची त्यांना
फुलतात भुलुनि तव नयनींच्या किरणांना !
तूं येतां त्यांचीं पानें–हालती !
तूं बघतां त्यांतुनि सुमनें–उगवती.
दशदिशांस निजगंधानें–भारती !
कापूसपुंजका हले जसा झुळुकेनें !
कळिकळी, वेल तशि हले तुझ्या स्पर्शानें !

(पान १०१)

या ओळींतील हळुवार नाजुकपणा कोणाच्याही हृदयाच्या तारा क्षणमात्र कंपित केल्याविना राहणार नाहीं.

इन्दुकान्तांच्या बहुतेक सर्व काव्यांत सुंदर शब्दांची पखरण पसरलेली दिसते. तथापि त्याबरोबर हेंहि त्यांच्या निदर्शनाला आणून देणें जरूर आहे, कीं कित्येक ठिकाणची त्यांची गद्य कर्णकटु शब्दयोजना, कल्पनाविसंगति व ढोबळ वृत्तरचना, हे दोष वाचकांना चांगलेच जाचल्याखेरीज राहणार नाहींत.

'मोंती' 'भरजारी,' 'विरालें,' 'सुंदरतासोनुकलें', 'भविष्यता', 'प्रीतइंगीत' हे शब्द नमुन्यादाखल देतां येण्यासारखे आहेत.

स्पर्शसुखाला ज्यांनिं मुकविलें सहा कोटिजीव,
शिकावयाला त्यांनिं नको का उज्ज्वल हें तत्त्व ?

(पान २१)

ही तव इच्छाही फुकट
सोडुनि दे तूं हें वेड !

(पान २७)

सोडिल्या कां अणी कोणी
विषारी नाग-नागिणी !

(गझल पान ३१)

कैदेमधिं येरोड्याच्या ।
तिन मास देह झिजवीला !

(पान ८६)

**सहजीं** तों बघुनी गुलाबसुमनें आकृष्ट ती जाहली,
**बिलगोनी** हृदयास घट्ट, भिडवी डोळ्यास डोळा झणीं !

(शार्दूलविक्रिडित पान ९५)

हीं वृत्तशैथिल्याचीं व गद्यरचनेचीं उदाहरणें म्हणून देतां येतील.

'माणिकमोती' हें 'मधु' कसें ? [पान ४]

प्रीतीचा 'व्याप' कसा जडतो ? [पान १५]

'दंव सोनुकुलें' हें शास्त्रीयदृष्ट्या 'उषारवी'चें बाळ' म्हणतां येणार नाहीं.

मोहकतेच्या लहरी फिरतां नयनींच्या रानीं,
भावलता लागल्या डुलाया मनिंच्या उद्यानीं !
सुंदरतेचा शरद् विहरतां नयनदिशांमधुन
प्रेमझरी झुळझुळूं लागली हृदयकडचावरुन

[पान ७२]

यांतील कल्पनाचित्रांचें विश्लेषण केलें तर भयंकरच घोटाळा उत्पन्न होण्यासारखा आहे.

प्रेमाच्या बाजारीं जिव हा भटकभटकला दीनाचा,
अखेर पटला सौदा सखिच्या नाजुक निर्मळ प्रेमाचा !

[पान ८५]

यांतील प्रेमविषयक कल्पना फारच Commercial आहे. 'प्रणयिनी' (पान ९०) या कवितेंत कवींनीं भर रस्त्यावर घडवून आणलेलें रमणीवल्लभ-चुंबन 'रोमँटिक' असलें तरी हल्लींच्या काळीं व्यवहार्य नाहीं हें सांगणें नलगे.

वर दर्शविलेल्या दोषांची खुरपणी केली तर इन्दुकांतांचा 'फुलबाग' निर्दोष व मनोहर होईल याविषयीं माझी खात्री आहे.

प्रीतच्या फुलबागेमधुनी मजेंत हिंडावें,
सुंदरतेच्या फूलपांखरांमागें धांवावें !

[ पान ४१ ]

हेंच एक वेड इन्दुकांतांच्या प्रतिभेला लागलेलें आहे व त्याच 'मनोहर वेडा'ची कवींनीं उपासना करावी. हें वेड यत्किंचित्‌ही कमी न होईल याबद्दलची कवींनीं खबरदारी घ्यावी. तसेंच–

सुंदरतेचें संगीत !
सदा रहावें गुणगुणत,

[ पान ३६ ]

हेंच एक ध्येय कवींनीं आपल्या डोळ्यांसमोर ठेवावें, म्हणजे मग ज्या 'तेजा'चा मागोसा घेत कवीनें आपली 'नवलाची मुशाफरी' (पान १००) आरंभलेली आहे त्या मुशाफरींत सामील होण्यास कोणालाही आल्हाद वाटल्याखेरीज राहणार नाहीं.

सारस्वत कॉलनी,
२५ डिसेंबर १९३५.

प्रल्हाद केशव अत्रे

## कवि "इन्दु-कान्त" यांचीं प्रसिद्ध पुस्तकें

**नंदनवनांत:**—( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )-

" 'नंदनवनांत' कादंबरीच्या लेखकानें प्रेमळ पतिपत्नींचें जोडपें रंगवून त्यांतील पतीला जी दुसरी स्त्री आवडूं लागते, तिला सवत म्हणून पत्नी मोठ्या आनंदानें घरांत आणते, असें दाखविलें आहे. जग पूर्णत्वाकडे चाललें आहे हेंच खरें.............. कलागुणांच्या दृष्टीनेंही या कादंबऱ्या कांहीं कमी विविध नाहींत."

—वि. स. खांडेकर
अध्यक्ष, कथाविभाग,
महाराष्ट्र साहित्यसंमेलन, बडोदें.

" ही सामाजिक कादंबरी कथानक व निवेदन-पद्धति यायोगें मनोरंजक झाली आहे."

—चित्रमयजगत्

" .... या कादंबरींत नाविन्य भरपूर आहे."

—केसरी.

# प्रकाशकाचे दोन शब्द

माझे स्नेही श्री. ज. श्री. नाईक ऊर्फ कवि इन्दुकान्त यांच्या काव्यांचा संग्रह "फुलबाग" या नांवानें मी आज प्रसिद्ध करीत आहें. सदर संग्रहास श्री. प्र. के. अत्रे यांनीं प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. तसेंच माझे स्नेही श्री. पी. एस्. काळे, आर्टिस्ट यांनीं कव्हरवरचें चित्र तयार करून दिल्याबद्दल व श्री. बाबूराव गोखले, वकील, श्री. व्ही. एन्. कुलकर्णी व प्रो. डी. वी. गोडबोले या स्नेह्यांनींही या फुलबागेबद्दल बरीच मेहनत घेतल्याबद्दल त्यांचा आभारी आहें. मुद्रक श्री. बापुराव राजगुरु यांच्या छापखान्यांत माझें हें सातवें पुस्तक छापून झालेलें असल्यामुळें आतां त्यांचे आभार मानावयाचे नाहींत असें मीं ठरविलें आहे. श्री. ज. श्री. नाईक यांनीं आपलें पुस्तक मला प्रकाशनास देऊन माझ्या गद्यप्रकाशनाच्या यादीस काव्याचीहि जोड मिळवून दिली आहे !

यशवंत गोपाळ जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वत्व प्रत

## माझें प्रकाशन —

१ वळवांचे पाऊस ( कथासंग्रह )

श्री. वि. वि. बोकील किंमत १। रुपया

२ पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह )

श्री. य. गो. जोशी किंमत १ रुपया

३ दुर्दैवी मोहरे ( ऐतिहासिक चरित्रें )

श्री. वि. गं. लेलें किंमत १ रुपया

४ पैसाच पैसा ( सचित्र नाटक )

श्री. माधवराव जोशी किंमत १ रुपया

५ जीवन-पथ ( कथासंग्रह )

श्री. एन्. एम्. केळकर किंमत १ रुपया

६ आवडत्या गोष्टी ( ६१ लेखकांचा कथासंग्रह )

संपादक य. गो. जोशी किंमत ३ रुपये

७ चित्तरंजन

श्री. पु. बा. साठे. किंमत १। रुपया

८ फुलबाग ( कविता )

कवि इन्दुकान्त. किंमत १ रुपया

९ वायफळांचा मळा

लेखक–चिं. वि. जोशी किंमत २॥ रुपये

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें आर्डरप्रमाणें पाठविलीं जातील.

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी,

८५४ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

[illegible] ग्रंथ [illegible]
[illegible]
इ. ........ नं. ........
ता. ............
आ. नं.



— कवि इन्दुकान्त

श्री. जनार्दन श्रीधर नाईक,
बी. ए., एलएल. बी.,
ॲडव्होकेट.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्वतंत्र प्रत
सं. ... नं. ...
ता. ...

## —समर्पण—

माझे परमपूज्य वडील
तीर्थस्वरूप "तात"—
[ रा. रा. श्रीधर आत्माराम नाईक,
ॲड्व्होकेट, रिटायर्ड चीफ जज्ज,
स्मॉलकॉज कोर्ट, पुणें ]
यांचे चरणीं
अत्यंत कृतज्ञतापूर्वक
समर्पण !

# गीतानुक्रम


| विषय | प्रसिद्धि | पृष्ठ |
|---|---|---|
| १ पाऊस | | १ |
| २ माणिक मोतीं | | ३ |
| ३ निर्व्याज आनंद | | ५ |
| ४ अभागी जीव... | [ रणगर्जना, नोव्हेंबर १९२६ ] | ७ |
| ५ गोड चुंबन... | [ साप्ताहिक सकाळ, १८ जुलै १९३३] | ९ |
| ६ प्रभात | | ११ |
| ७ नलिनीबाला | | १३ |
| ८ इन्दुदर्शन... | [ संजीवनी, ७ डिसेंबर १९३३ ] | १७ |
| ९ सूर्यदर्शन | | १९ |
| १० फुलबाग | | २२ |
| ११ प्रेमासाठीं मरण | [एल्फिन्स्टन कॉलेज मॅगेझिन, फेब्रुवारी १९२५] | ३० |
| १२ सवाल | | ३१ |
| १३ मधुमीलन | | ३२ |
| १४ चोरी | | ३३ |
| १५ सौंदर्य | | ३५ |
| १६ विधवेचें स्वप्न | | ३८ |
| १७ वेड... | [ यशवंत, नोव्हेंबर १९३० ] | ४१ |
| १८ हृदयाची तळमळ | | ४३ |
| १९ फुलांची माळ | | ४६ |
| २० मी माझा आहें राजा... | [ पारिजात, एप्रिल १९३४] | ४९ |
| २१ दंव | | ५२ |
| २२ प्रेम आणि मरण | | ५५ |
| २३ चांदण्या | | ५७ |
| २४ फुलवाला | | ५९ |
| २५ हृदयाचें गीत | | ७२ |

| विषय | प्रसिद्धि | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| २६ भगिनी मम स्वर्गी गेली | | ७७ |
| २७ निराशा... | [ फर्ग्युसन कॉलेज मॅगेझिन, फेब्रुवारी १९२३ ] | ८१ |
| २८ विनंति | | ८२ |
| २९ हृदयाची कबुली | | ८५ |
| ३० देशभक्त शंकराव | | ८६ |
| ३१ प्रेमाची तात्त्विकता | | ८८ |
| ३२ प्रणयिनी | | ९० |
| ३३ दैव | | ९३ |
| ३४ जातिवंत फुलें | | ९५ |
| ३५ दुःखांत सुख... | [ रत्नाकर, फेब्रुवारी १९३२ ] | ९६ |
| ३६ धांवा... | [ साप्ताहिक सकाळ, १२ डिसेंबर १९३३ ] | ९८ |
| ३७ नवलाची मुशाफरी... | [ सह्याद्रि, मे १९३५ ] | ९९ |
| ३८ तुझ्यासाठीं | | १०१ |
| ३९ चेतना... | [ ज्ञानमंदिर, १५ मे १९३५ ] | १०३ |
| ४० अज्ञात | | १०४ |
| ४१ सारंगी | [ कला, जुलै १९३५ ] | १०५ |
| ४२ कां ? | | १०६ |
| ४३ जाणीव... | [ ज्ञानमंदिर, सप्टेंबर १९३५ ] | १०७ |
| ४४ नशिबाचे खेळ | | १०८ |
| ४५ श्रीमहाराष्ट्रगीत | | १०९ |
| ४६ ध्येय | | १११ |
| ४७ चटकचांदणी | | ११२ |
| ४८ सुखदुःखहीन जीवन | [ज्ञानमंदिर, दिवाळी अंक, ऑक्टो. १९३५] | ११३ |
| ४९ ईशस्तवन | | ११४ |
| ५० बंडखोरी | | ११५ |
| ५१ जीवनसमाधि | | ११७ |

# प्रथमचरणांची सूचि


| | |
|---|---|
| अखिल चराचर ब्रह्मांडाच्या अगाध शक्तीची | १९ |
| अजब नयनजादूगिरिनें भारुनी मनास | ९३ |
| अवकाशाच्या नवउद्यानीं | ९ |
| असार ज्या संसार कां तया दुनियेची दरकार | ७ |
| अक्षयताहृदयावरलें | ३५ |
| अंगणीं नभींच्या करी सारखा खेळ | १ |
| अंधार हा भौंतालचा कांहीं दिसूं देईच ना | १०३ |
| आकाशीं 'फुलबाग' फुले | २२ |
| आनंदें अथवा खेदें | ३ |
| कानांवरि येउनि पडला | ८६ |
| काळ चालला झराझरा | ९९ |
| कुठें एक क्षण मीं तुला पाहिलें | १०४ |
| कुणी कुजबुजती तिज रोज बघून | १०८ |
| कोठें निर्जन जागिं ते पसरले उत्तुंग काळे कडे | १०६ |
| गगनोद्यानीं पुष्प विकसलें का हें कल्पलतेचें | १७ |
| जगाला गांजला जीव | ३१ |
| ठेवा बाई मोलाचा | ३३ |
| दिन फार तुझ्या भेटीला | ८२ |
| देना दर्शन विश्वाधार | ११४ |
| नटुनी थटुनी आली हो आभाळीं | ५५ |
| नलिनीबाला क्षणाक्षणाला | १३ |
| प्रीति-फुलाच्या मधुर परिमलें | ५२ |
| प्रीतीच्या जीवाला देवा | ९८ |
| प्रीतीच्या फुलबागेमधुनी मजेंत हिंडावें | ४१ |
| प्रेमाच्या बाजारीं जिव हा भटक भटकला दीनाचा | ८५ |
| बघुनि त्या क्षणीं तुला साजणी जडतामय जीवनीं | ११२ |

| | |
|---|---|
| ब्रह्मांड भारणारी | ३२ |
| बाला सुंदर कोणि एक विहरे बागेंत एकीकडे | ९५ |
| बाळ तान्हुलें गोजिरवाणें प्रेमाचें फूल | ४६ |
| भ्रांती सारी गळे | ११७ |
| मानसमैने गाच गडे तूं हृदयाचें गीत | ७२ |
| मी कोण, कोठुनी कशास आलों येथें | ४३ |
| मी माझा आहें राजा | ४९ |
| या कळ्या उमलल्या जीवनवेलीवरल्या | १०१ |
| या या झडकरी या प्रभुराया | १०७ |
| रमणीय अवकाशाचें जलाशय | ११ |
| लताकुंज बहरले | ५७ |
| लवलेश सुखाचा नसे | ९६ |
| लाभली आज ही सारंगी | १०५ |
| लुकलुकती तारा हंसरी | ५ |
| वाटेंतुनि जातांना वळुनिवळुनि कां बघतां | ९० |
| वंदन हें देवी तुज चिदानंददायिनी | १११ |
| शूर महाराष्ट्रा हे सृष्टिनंदना | १०९ |
| श्रीमंत, गरिब, दुर्गुणी, गुणी | ११५ |
| सरितेशीं मधुमीलन होई निर्झर-हृदयाचें | ३० |
| सहज बाइसुखशयनावरती | ३८ |
| सुरम्य, सविनय, प्रणयमुग्ध तव वदन-कमल पाहुनी | ८१ |
| सुंदर एका बागेमधल्या कारंज्याजवळ | ५९ |
| हृदयाच्या गिरिशिखरावरुनी निर्झर निर्मल प्रेमाचा | ८८ |
| ही वार्ता अवचित आली | ७७ |
| होतें सौख्य मनास कांहिं अपुल्या होतां मनासारखें | ११३ |

टीप—पान १०५ या कवितेंतील

थरथरे जीव हा गातांना  जीवनास मग ये न्यूनपणा

या ओळीपुढें

लाभली अशा या बदरंगी  दिलप्यार बहुगुणी सारंगी

अशी ओळ वाचावी.

# फुलबाग

## पाऊस—

[ जाति—भूपतिवैभव

अंगणीं नभींच्या करी सारखा खेळ
रविबाळ लाडका सृष्टीचा तेजाळ !

निजनयनीं बघुनी बाळाचा तो चाळा
बहु हर्ष जाहला मातेच्या जीवाला !

परि सुखामधीं त्या विचार न कळे कसला—
मनिं सहज येउनी जाळि तिच्या हृदयाला :—

"हा बाळ गुणांचा माझा पंचप्राण
जगिं नाहिं बाइ मज प्यार याहुनी कोण !

हें थिटें होतसे अंगण त्याच्या खेळा
हळु जाइल बाई चुकवुनि माझा डोळा

हुरहूर सारखी रात्रंदिन जीवा ही
मुळिं सुचे न बाई म्हणुनी मजला कांहीं !"—

बोलुनी असें ती नयनीं आणी प्राण—
लडिवाळ जिवाचें बघण्या ठावठिकाण

गड्गडाट झाला !— मेघ नभीं ओरडला !
त्या साथ कराया वारा धांवत आला

अंधार जाहला ! दिशा त्यामधीं बुडल्या
तरुलताहि नमल्या, मोडुनि कांहीं पडल्या

तशि सृष्टिमाउली मनीं दचकुनी भ्याली
क्षण नजर भीतिची सभोंवतालीं फिरली

मग 'दिवा विजेचा' हळुच तिनें लावियला !
परि नाहिं कुठें तो बाळ तिचा तिज दिसला

जिव सुन्न जाहला ! शुद्धबुद्ध तिची हरली
अन् क्षणांत नयनीं आंसव-दाटी झाली

कोसळूं लागल्या तिथुनी मग जलधारा !
हृत्प्रदेश त्यांनीं गेला भिजुनी सारा !

मुंबई–फोर्ट,
१५ डिसेंबर १९२३.

# “ माणिकमोतीं ”—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. क्र. ५१३८
दि. ...

—ज्योति-बालानन्द

आनंदें अथवा खेदें    हृदयातें येतां भरतें
नयनांच्या शिंपापोटीं    खुलतें मधु माणिकमोतीं !
आनंदाचें मधुमोतीं    हृदयांतीं पसरी शांती !
परि दुःखें उद्भवलेलें    करी जित्याला मेलेलें !

नवनवती नाजुक नार    होती निजनाथा प्यार !
संसाराचें सुखसार !    आनंदाचें माहेर—
वाटे निजपतिहृदयाला    सद्गुणमंडित ती बाला;
सौंदर्याची जणुं खाण    पतिच्या हृदयाचा प्राण
गुणगण सौंदर्यें विलसे    कोंदणिं चमके रत्न जसें !
त्यापरि निजपति तिज प्राण वाटत होता मनांतुन !
दुःखामधला आनंद !    आनंदीं ब्रह्मानंद—
परस्परांना दोघें तीं    संसारीं मानित होतीं !
दुःखाची मुळिं छायाही    मनास कधिं शिवली नाहीं
आनंदाचें राज्य दिसे !    शांति सुखाची नांदतसे
नैराश्याचें ध्वांत पळे    सुखमय भासे जग सगळें
दुःखच नुरलें हृदयाला    विसर जगाचा मग पडला
परी सदाचा आनंदी    कोण असे या जड जगतीं ?
सौख्याच्या शिखरावरुनी    पडणें दुःखाच्या दरीं—
ठरावीक ही जगरीत    नाहिं कुणाला ही कळत !

नोंद क्र. ७३७८

आनंदाच्या संसारीं      असतां आला तिच्यावरी—
प्रसंग मोठा अति बिकट ! आठवलें मग ब्रह्मांड !
प्रियकर संसारांतून      गेला तिजला सोडून !
संसाराची त्या माती      क्षणामर्धी झाली पुरती !
दुःखपूर्ण त्या संसारीं      जीव एकला वास करी !
सौख्याचा लवलेश नसे      चोहिंकडे अंधार दिसे
'मरणांतीं प्रिय नाथाची      भेट घडावी कायमची'—
आशा हृदया एकच ती      दे तिज सौख्याची स्फूर्ती
प्रिय नाथाच्या भेटीचा      विचार येतां सौख्याचा—
नयनांच्या शिंपापोटीं      खुललें मधु माणिकमोतीं !

मुंबई–फोर्ट,
१८ जानेवारी १९२४.

स्थळ प्रत

# निर्व्याज आनंद !

[ जाति—चालानन्द

लुकलुकती तारा हंसरी नभांत नाजुक नाच करी
नयनचमक तिचि सुबक किती मोहजाल पसरी भोंतीं
परी सुखाच्या ऐनभरीं गळुनी पडते भूमिवरी
हातोहातीं
क्षणांत पुरती
होते माती
तरी लाभतो नवा नवा 'आनंदी आनंद' जिवा !

फूल लतेवर छान फुले भेटे रवि त्या करजालें
फुलराणी त्या करपाशीं बद्ध करी निज हृदयासी
मीलन परि त्या जीवांचें नसतें मुळिं तें कायमचें
दो दिवसांनीं
ती फुलराणी
पडेल गळुनी !
तरी लाभतो नवा नवा 'आनंदी आनंद' जिवा !

सौख्य असे का जगण्यांत ? सौख्य असे का मरण्यांत ?
स्वप्नसृष्टि ही सौख्याची ! भुलावणी आभासाची !
सौख्य असे बुद्बुदलहर या जीवनसागरावर !
या जड जगतीं
सौख्यशांति ती
नांवापुरती !
तरी लाभतो नवा नवा 'आनंदी आनंद' जिवा !

दंवबिंदुहि सुमनावरती    भासे तेजस्वी मोतीं !
घेतां हातीं काढोनी    असतें केवळ तें पाणी !
त्यापरि सुख मायाभासें    खरेंखुरें हृदया भासे !
जगतावरचें
जिणें जिवाचें
'दो दिवसांचें !'
तरी लाभतो नवा नवा    'आनंदी आनंद' जिवा !

मुंबई–फोर्ट,
२६ जानेवारी १९२४.

# अभागी जीव !—

[ चाल—अवेळ तरिही बोल

असार ज्या संसार कां तया 'दुनियेची दरकार' ?

उजाड जगीं या जड जीवाला
अवजड जीवनभार जाहला
उगाच मग ती कशास त्याला—

मर्त्यजगींची कीर्ति-सुखाची वेडी आटाआट ?

जिवंत आशाज्योत मनींची
पसरी माया चैतन्याची !
सृष्टि उभारी दिव्य सुखाची !

परी क्षणाच्या मुदतीचा हा सौख्याचा बाजार !

आशेच्या मृदु शेजेवरती
जीवित जगतीं घे विश्रांति !
हांव कीर्तिची असते चित्तीं !

अखेर हातीं येते माती ! हाच जगाचा न्याय !

नैराश्याची जळती आग
जाळि मनींची फुलती बाग !
फुलें उमलतीं जागोजाग—

करपुनि गेलीं ! आतां कसली जिवास उरली चाड ?

सौख्याशेची झाली माती !
तीव्र वेदना मनास खाती !
उदासीनता भयाण भोंतीं !

नैराश्याचे विषण्णतेचे कांटे जागोजाग !

जनांत हंसणें ! मनांत रडणें !
नसत्यासाठीं मनांत झुरणें !
मरण्यासाठीं केवळ जगणें !—
गतकाळींच्या कर्मानें हें ठरलें जीवित-ध्येय !

नुरली इच्छा ! नुरली आशा !
उरली केवळ एक निराशा !
दैवीं चिरदुःखाचा पेशा !
उदासवाणें जगांत जगणें लाभ जीवनीं हाच !

विश्वपसारा अपरंपार !
उभारला चिच्चैतन्यावर !
जीव त्यामधीं फिरतो गरगर !
गरगर फिरतां गिरकि येउनी जिव झाला बेताल !

अज्ञाताचा अपार सागर !
काळाचा तो खडक भयंकर
नेटाची त्या देउनि टक्कर—
पोहुनि जावें पार त्यांतुनी, इच्छा ही अनिवार !

एकांताची धरुनी संगत !
मूकपणाचें गाउनि गीत !
पुढें ढकलणें असेंच जीवित !—
दुनियेच्या दरबारीं ज्याला हाच एक अधिकार—
कां तया 'दुनियेची दरकार' ?

खानोली,
२३ मे १९२४.

# गोड चुंबन !—

[ जाति—पादाकुलक

अवकाशाच्या नव उद्यानीं
वसुंधरेच्या अंकिं बैसुनी
गात मनीं हृदयाचीं गाणीं
विरहव्याकुला— रजनीबाला— रिझवी निज हृदयास !

गीतनादिं परि चित्त रमेना
गीताचाही सूर जमेना !
सहन होइना विरहयातना !
हृदयरंजना—उपाय नाना—करुनी झालि उदास

शुभ्र, पांढरीं, गोजिरवाणीं—
कितीक गगनीं फुलें उमलुनी
परिमल पसरति दाहि दिशांनीं !
तयांस बघुनी—रजनी राणी—विचार करि हृदयांत—

"ताजीं, ताजीं फुलें निवडुनी
सुंदर त्यांची माळ गुंफुनी
अर्पिन प्रेमें प्रियकरचरणीं !"—
या सौख्याचे—भरांत नाचे—हृदय तिचें अनिवार !

दिव्य फुलें तीं घेउनि हातीं
माळ गुंफिली हातोहातीं
येउनि बसतां मग एकांतीं—
अव्याज मनें— ती प्रेमानें— पतिची पाही वाट !

प्रणयाचा मनिं भरला पूर !
दयितचिंतनीं झाली चूर !
हृदय जाहलें मग अनिवार !
प्रणयभावना—सौख्यकामना—तरंगली हृदयांत !

सौख्यतरंगें रंगे जीव !
प्रणयचिंतनीं विरला भाव !
तन्मय झालें चिद्राजीव !
दिव्यानंदीं—दिव्य समाधी—लागे मग निमिषांत !

उदयगिरीचें उघडुनि दार
आला रजनीपति बाहेर
गगनमंदिरीं शिरुनी सत्वर—
गोजिरवाणा—तिज शशिराणा—कवटाळी हृदयास !

रजनी लाजुनि होई दूर !
परि न सोडि तिज प्रणयी वीर !
पसरुनि तिजवर शीतल निज कर—
जवळ ओढुनी—हृदया धरुनी—घेई चुंबन गोड !

प्रेमें जवळी येतां प्रियकर
माळ अर्पुनी तच्चरणांवर
रजनी बोले मनांत सत्वर—
"मंगल लेणें—हें नशिबानें—हातीं आलें आज !"

धुळें,
१४ जून १९२४.

# प्रभात —

[चालः—ला—चाईला.

रमणीय अवकाशाचें जलाशय !
विश्वमन मोहविणारें, त्यांतून—
झुळझूळ वाहतसे चैतन्यजल !
त्या स्थानीं उषा-सखीला घेवोनी
रिझवाया विरहव्यथित अपुल्या हृदया
एकांतीं मुरडत आली सृष्टिसती
मनोमन करुनी अभ्यंगस्नान
बाहेरी आली मग वसुधा नारी
नेसून लगबग भरजारी वसन
घेऊन शालू अरुणाचा वरुन
लेऊनी सोन्यामोत्यांचीं लेणीं
दारिं उभी सृष्टिसुंदरी बघत नभीं
रविराज चढवुनि सोनेरी साज
रम्यतर उघडुनि पूर्वेचें दार
डौलांत शिरला गगनमहालांत
डोकावी तों दिसली वसुधादेवी
रविराणा पाहुनि सुंदरिच्या वदना
स्वच्छंदें नाचुं लागला आनंदें !
मग पसरी सहस्त्र निजकर तिच्यावरी

क्षणिं हंसरी  झालि तशी वसुधानारी
प्रेमगुणीं  वसुधा तन्मय होऊनी
उतरूनी  अरुणशालु अंगावरुनी
हृदयासीं  फेंकी मृदु रविकरपाशीं
हें बघुनी  उषासखी गेली निघुनी
मोदभरें  गाई कोकिळ मधुस्वरें
चंडोल  आनंदानें धरि ताल
मरुद्गण  होउनि प्रभुचरणीं लीन–
मौजेंत  गाउं लागले स्तुतिगीत !

धुळें,
१६ जून १९२४.

# नलिनीबाला—

[ जाति—बालानन्द

नलिनीबाला क्षणाक्षणाला
पवनासंगें करि लीला
रविकर-जाळी तिचिया भाळीं
वाही प्रीतीच्या माला
लतिकासुमनें आनंदानें
गाती गीतें तिजपाशीं
सभोंवतींचा गंध फुलांचा
सुखवी तिचिया हृदयासी
तरुवेलींची प्रेमळतेची
पसरे छाया तिजभौंतीं
चांद नभींचा धवल प्रीतिचा
टाकि पाश मृदु तिजवरती
विहंग वरती स्वैर विहरती
हितगुज करिती प्रेमाचें
सदा यापरी सृष्टी सारी
पसरी जाळें प्रेमाचें !
प्रेमें नटली नलिनी भुलली
तन्मय झाली प्रेमगुणीं
मनांत रंगे प्रणयतरंगें
गुंगे मन आनंदोनी

नलिनीराणी   नयनीं आणी—
पाणी प्रेमाचें विमल
गाउनि गाणीं   मंजुळवाणी
फुलवी जीवाचें फूल
सुहास्यलहरी   तिचिया अधरीं
करिती लीला प्रेमाची
गोंडस गालीं   राजस लाली
विलसे नाजुक प्रीतीची
परि करमेना   जीव रमेना—
नाजुक नलिनीबालेचा
ध्यास लागला एक जिवाला—
कल्पित प्रियकर-प्रीतीचा
हितगुज मनिचें सांगायाचें
कोणापाशीं तिज न कळे
हृदय कळवळे जीव तळमळे
शून्य भासलें जग सगळें
जीव जगाला   पुरा गांजला
प्रियकरसहवासाभावीं
मेल्यावाणें   जगांत जगणें
नशीब ठरलें तें भावी ?
असें मानुनी   सारखी मनीं
झुरत चालली दुःखांत

तोंचि त्या क्षणीं पातला कुणी—
भृंग मनोहर डौलांत
पाहुनि सुंदर सुबक, मनोहर
नलिनीबालेचें रूप
हृदयीं ध्याला भान विसरला
जडला प्रीतीचा व्याप !
त्यापरि तिचिया लागे हृदया
ध्यास तयाच्या प्रेमाचा
क्षणांत जडला जीव जिवाला
प्रेमानें त्या दोघांचा
मूक मनानें भेट सुखानें—
ठरला घेण्याचा बेत
तेथुनि उठला भृंग परतला
भावि सुखाच्या आशेंत
एक जिवाला विषय जाहला
सखिच्या सुखकर भेटीचा
रात्र संपली पहांट झाली
उगवे दिन तो सौख्याचा
मनीं मोदला क्षणांत सजला
भृंग सखीच्या भेटीला
येउनि पाही तों भयदायी
नयनां देखावा दिसला !

नाचत मुरडत क्षणांत हांसत
स्वर्गिय सुंदर कुणि बाला
धांवत आली नलिनीजवळी
बघुनी नलिनीसुमनाला
निजनाथाला अर्पायाला
नलिनीवरच्या सुबक फुला
सहज मजेनें निजहातानें
क्षणांत तोडी नलिनीला !
नाजुक नलिनी पडली गळुनी
क्षणांत मुकली प्राणाला !
बसला जहरी घाव जिव्हारीं
प्रसंग पाहुनि तो तसला
दुःखिं विवळला ! निश्चल झाला
दुःखावेगें भृंग मनीं
हृदयिं दाटला थोर उमाळा
भिजवी काया अश्रूंनीं
जीव गळाला मरुनी पडला
मरतां मरतां तो वदला—
"प्रेमापायीं नशिबीं येई—
मरण असें हें जीवाला !"

सातारा-कँप,
६ ऑक्टोबर १९२३.

# इन्दु-दर्शन !

ग्रंथ संग्रहालय
क्र. ७१३८
दा. ७०२

[ जाति–साकी

गगनोद्यानीं पुष्प विकसलें का हें कल्पलतेचें ?
कीं विश्वाच्या चैतन्याचें निधान मांगल्याचें ?
नव रमणीच्या मुग्धत्वाचें, नितांत कवि प्रतिभेचें–
तेज विमल हें पतिव्रतांच्या किंवा पावित्र्याचें ?
शिवनेरीच्या शिवरायासम शौर्याचे शाहीर–
थोर, थोर नरवीर तयांचें काय यशोभांडार ?
दीप लागला शयनमंदिरीं कीं हा परमेशाचा ?
अथवा नंदादीप जळे हा पूर्वज पुण्याईचा ?
नवरत्नांनीं भरला नभिंचा सागर मंथन करुनी–
काय काढिला तेजस्वी हा कौस्तुभमणि त्यांतूनी ?
प्रीत-बालिका निसर्गराणा यांच्या नवप्रीतीचा–
नाजुकसा हा ठसा उमटला रंगमहालीं साचा ?
चंद्रकळा अंगावरि काळी, कंठीं ताराहार–
घालुनि सुंदर सृष्टिसुंदरी विरहोत्सुक फार
रूप आपुलें नभोदर्पणीं उत्सुकतेनें पाही–
काय त्यांत प्रतिबिंब उगवलें त्याचें हें मनमोही ?
मोहक, मंगल, आणि दिव्य जें खुलवी या भूभागा–
एकवटे कीं एके ठायीं त्याची ही रसगंगा ?

देवाघरचीं बाळें, वरच्या बागडती बागेंत
सुंदर त्यांनीं चेंडु उडविला कीं हा आनंदांत ?
स्वर्गीच्या हा कुणा परीचा अथवा गोंडस बाळ—
आकाशांगणिं एकसारखा खेळे रांगणखेळ ?
निशादेविच्या सौभाग्याचें कीं हें मंगल लेणें ?
कांहिं कळेना ! हृदयसृष्टि परि फुलली नव तेजानें !

सातारा, कॉटेज;
६ नोव्हेंबर १९२३.

# सूर्य-दर्शन—

[ जाति—चंद्रकान्त

अखिल चराचर ब्रह्मांडाच्या अगाध शक्तीची—
उंच फडकते दिव्य पताका का ही स्वर्गीची ?

ज्या तत्त्वांवरि विश्वचक्र हें रचिलें ईशानें—
एकवटे हें तेज तयाचें काय दिमाखानें ?

कंठमणि असे तेजस्वी हा काव्यसुंदरीचा ?
मणि कंठांतिल अथवा का हा पुराणपुरुषाचा ?

जगन्माउली चिच्छक्तीचा तान्हा नवसाचा—
काय जन्मला दूर कराया पडदा मायेचा ?

आदिपुरुष अणि प्रकृति यांच्या अभिनव प्रेमाचा—
अथवा का हा बाळ लाडका अखंड तेजाचा ?

गगनाच्या पाळण्यांत निजला कर करुनी चाळा
जागा होउनि पाही आतां विश्वाचा चाळा !

शेषाच्या मस्तकांत विलसे मणि जो तेजांत—
काय पडे ही छाया त्याची वरच्या दर्यात ?

गोकुळिंच्या श्रीकृष्णाचें हें सहस्रधारांचें—
चक्र सुदर्शन देई दर्शन अपुल्या तेजाचें ?

पद्मासन आसनस्थ होतो ज्या पद्मावरती—
काय तयाची प्रतिमा शोभे उज्ज्वल ही वरती ?

सहस्र तेजाचीं मुखकमलें सहस्रशीर्षाचीं
कंठावरि ज्या उभारलीं त्या मूर्ति कंठाची—

जीव जातसे शव सोडुनी नवथर देहाची—
जोड मिळविण्यासाठीं अंतीं शिवपदप्राप्तीची !

पुण्यवान त्या जीवाचें हें अखेरचें ठाणें—
काय असे ? कुणि सांगावें तें ? जीव तोचि जाणे !

देवाघरिं वरि तेजाचें जें पसरे भांडार—
काय तयाचें हें मोलाचें सोनेरी दार ?

तळ वसुधातल, गगन मनोहर पृष्ठभाग ज्याचा
सजीव, जड जीवांचा ज्यामधिं भरणा मोलाचा—

भांडागाराचें त्या का हें झांकण सोन्याचें—
झुले सारखें त्रिभुवनिं ज्याच्या तेज दिव्यतेचें ?

दूत ठेविला कीं हा ईशें अनुपम तेजाचा—
शोध कराया जगतावरच्या पापापुण्याचा ?

सहस्र त्याचे हेर अनुदिनीं जाती भूवरती
धुंडुनि चोहींकडे तयाची नोंद त्यासि देती !

गगनींचा हा सम्राट् विसरुनि उच्चभाव अपुला
स्पर्शें सुखवी ब्रह्मांडाच्या कोनकोंपऱ्याला !

स्पर्श-सुखाला ज्यांनिं मुकविले सहा कोटि जीव
शिकावयाला त्यांनिं नको का उज्ज्वल हें तत्त्व ?

मुंबई—फोर्ट,
४ डिसेंबर. १९२३.

काय उभी ठाकली नभावरि मोहक ही विमल—
सहस्र मुखकमलांनीं फुलवी जगताचें कमल ?

चंद्रमौलिनें तृतिय नेत्र कीं क्रोधें उघडीला—
काय उसळली तयांतुनी ही अग्नीची ज्वाला ?

ज्वालेनें त्या भस्म कराया विश्वाचें पाप—
सरसावे तो आवेशानें जगन्मायबाप !

प्रलयाग्नी होणार जो जगीं जगताच्या अंतीं—
काय तयाची उठली वरती अस्फुट ही मूर्ती ?

जाळुनि पोळुनि नाश कराया तिमिर-दानवाचा
पेटविला का जाळ कुणी हा प्रचंड तेजाचा ?

दुष्ट निशाचर आणि अमर जे त्यांचें निकराचें
युद्ध जुंपलें नष्ट कराया तिमिरदुःख भूचें !—

युद्धामधिं त्या विजयी झाले अमरचि स्वर्गींचे
म्हणुनी फडके दिमाखांत हें विजयाचिन्ह त्याचें ?

पुण्य तपस्वी होउनि गेले जे जगतावरती
काय तयांच्या ओज तपाचें पसरे हें वरती ?

अथवा झाला क्रोध जो महा जगावरी त्यांचा
ठसा उठे हा महा भयंकर वरती का त्याचा ?

होम चालला अनुदिनिं वरती जगन्नायकाचा—
तयासाठिं का पेटविला हा अग्नि सुवर्णाचा ?

मृत जीवांची वाट काय ही स्वर्गा जायाची—
राख होतसे ज्यांत जळूनी पापी जीवांची ?

जीव जातसे शीघ्र सोडुनी नवथर देहाची—
जोड मिळविण्यासाठीं अंतीं शिवपदप्राप्तीची !

पुण्यवान त्या जीवाचें हें अखेरचें ठाणें—
काय असे ? कुणि सांगावें तें ? जीव तोचि जाणे !

देवाघरिं वरि तेजाचें जें पसरे भांडार—
काय तयाचें हें मोलाचें सोनेरी दार ?

तळ वसुधातल, गगन मनोहर पृष्ठभाग ज्याचा
सजीव, जड जीवांचा ज्यामधिं भरणा मोलाचा—

भांडागाराचें त्या का हें झांकण सोन्याचें—
झुले सारखें त्रिभुवनिं ज्याच्या तेज दिव्यतेचें ?

दूत ठेविला कीं हा ईशें अनुपम तेजाचा—
शोध कराया जगतावरच्या पापापुण्याचा ?

सहस्र त्याचे हेर अनुदिनीं जाती भूवरती
धुंडुनि चोहींकडे तयाची नोंद त्यासि देती !

गगनींचा हा सम्राट् विसरुनि उच्चभाव अपुला
स्पर्शें सुखवी ब्रह्मांडाच्या कोनकोंपऱ्याला !

स्पर्श-सुखाला ज्यांनिं मुकविले सहा कोटि जीव
शिकावयाला त्यांनिं नको का उज्ज्वल हें तत्त्व ?

मुंबई—फोर्ट,
४ डिसेंबर. १९२३.

## फुलबाग—

[ जाति—बालानन्द.

आकाशीं 'फुलबाग' फुले    दिव्य अशा चैतन्यजलें !

निशादेविच्या आवडत्या    काळोखाचें कुंपण त्या !
इवलालीं नक्षत्रफुलें    फुलविति तेजें नभ सगळें !
लपती रविच्या तेजांत !    बागडती काळोखांत !
खेळ तयांचा गमतीचा    काळोखीं खेळायाचा !

देवाघरचा
बागबगीचा
हा मौजेचा

सुखवी कष्टी जीवाला    नाचवि कविच्या हृदयाला !

खेळ मांडिला काय कुणी    आकाशाच्या पटांगणीं ?
खेळ खेळते का रजनी    गुच्छ फुलांचा घेवोनी ?
वाव असे का जड हृदया    खेळाया तेथें जाया ?
देवाघरचे हे खेळ    कधीं मनाला कळतील ?

दिव्यत्वांजन
नयनीं घालुन
पहा मनोमन

तोडुनि मोहाची बेडी    सुटतिल मग असलीं कोडीं !

पहा कशी 'वसुधामाई'    वरती डोकावुनि पाही
गोजिरवाणीं, छान फुलें    बघुनी वसुधा मनीं डुले

हर्ष माइना हृदयांत नाचुं लागली हर्षांत
खेळे हृदयीं स्वानंद ! जडतेचा तुटला बंध !
वृत्ति विराली
त्या अवकाळीं
मोहनजाळीं
बघतां उघडी तेजाची माया मोहमया वरची

" सौंदर्याचें रससार मोहनतेचें भांडार—
जादुगार हा कोण असे उघड्यावरती मांडितसे ?
रक्षण त्याचें करणार कोण असा जगतीं चतुर ?"—
वसुधेला हें गूढ पडे हृदय जाहलें मग वेडें
वेड जाइना !
गूढ कळेना !
तरंग नाना—
मनीं घालिती थैमान नुरे जगाचें मग भान

क्षणांत वसुधा त्या काळीं निद्राजाळीं गुरफटली
निद्रेमाजी, सुखदायी स्वप्न एक मग ती पाही
स्वप्नसंगमीं मोहवशें दिव्य दृश्य तिज एक दिसेः—
नितांत सुंदर कुणि बाला दिसली येतांना तिजला
अंगांगांतुन
तेजोमोहन
वाहे प्रतिक्षण !
चैतन्याची जणुं ज्योत वितरी जीवन जडतेंत !

दिव्य अशा त्या बालेला   बघुनी वाटे नवल तिला
धीर मनाचाही सुटला   सुटे कंप मग हृदयाला
डोळे उघडुनि बघवेना !   हालचालही करवेना !
शांति पसरली भौंतालीं   इकडे, तिकडे, वर, खालीं
दिव्य शांतता
नयनीं बघतां
वसुधामाता
हळूच वरती डोकावी   तों दिसली ती स्वर्देवी !

विनयें मग वसुधा बोले, " प्रणाम माझा तुज बाले !
दिव्य तेज हें तव अंगीं   बघुनि भावना हो जागी
आलिस कोठुनि, कां बाले   सांग कोण तूं मज सगळें !
निवास जडस्थानीं तुजला   गोड कसा बाई गमला ?
मधुर हांसली
बाला गालीं
मग हळु वदली:—
"ऐक कोण मी, कां येथें   चित्त देउनी तूं वसुधे:—
जगन्माउली चिन्माता   खेळवितें मी या जगता !
माझ्या चैतन्यें भरलें   सजीव, जड हें जग सगळें
तारक मारक या भुवनीं   त्रिभुवन सारें मज मानी !
या साऱ्या विश्वामाजी   सत्ता अनियंत्रित माझी !
मी सुरबाला
चराचराला
ब्रह्मांडाला
अंकित माझ्या ठेवितसें   म्हणुनि जगाला वंद्य असें ? "

सं. ........
ता. ........



पुन्हा वंदुनी चरणाली    वसुधा हळु बोले तिजला:—
“बाग फुलांची ही वरची    सांग असे मज कोणाची?
काळोखीं ती कां फुलते?    दिवसाची कोठें असते?
तेज मिळे हें कुठुनि तयां    वेड लावि जें जग-हृदया?
असे का कुणी
असा त्रिभुवनीं
धन्य नरमणी
निज काया या सुमनांनीं    घेई जो शृंगारोनी?”

त्यावरि सुरबाला वदते    ऐक सांगतें तुज मी तें:—
“त्रिभुवन व्यापुन जें राही    आदि, अंत ज्या कधिं नाहीं
मूल तत्त्व जें परमोच्च    ‘ब्रह्म’ वदे ज्या वेदवच
त्याची सारी ही किमया    उभारि वर ‘फुलती दुनिया’
तिज रक्षाया
आणि फुलाया
मी मधु माया
नित्य पसरितें भोंतालीं    दृश्य नसे जी भुवनतलीं!

आणिक माझी चौफेर    फिरे सदा करडी नजर
जगताची पापी नजर    चुकवाया इच्छा थोर!
म्हणुनी रात्रीच्या समयीं    फुलते ही मधु फुलराई!
प्रात:काळीं हळु उठुनी    फुलें तोडुनी मी आणीं
घेउनि हातीं
सुमनें फुलतीं
‘ब्रह्म’पदीं तीं
अर्पण करितें मी सगळीं    दिवसाच्या उघड्या वेळीं!”

ऐकुनि मधुवच हें सगळें   आनंदें वसुधा बोले:—
" जिव माझा आतुर झाला   बगिचा वरचा बघण्याला
कर कांहीं, परि वर नेईं   तूं मज बाई लवलाहीं
इच्छा माझी एकच ही   पुरी करीं इतुकी बाई!"
वच हें ऐकुनि
मनीं त्या क्षणीं
क्षण घाबरुनी
तटस्थ झाली चिह्लाला!   बोले मग ती वसुधेला:—

" वेड लागलें का तुजला   भलभलतें बोलायाला?
हट्ट तुझा भलता बाई   पुरा कधीं होणें नाहीं!
दिव्य सृष्टि देवाघरची   नयनीं केवळ बघण्याची!
नसे योग्यता जडतेची   सहजीं तेथें जायाची!
मनिं हें आणुनि
दे सोडोनी
आशा तव झणिं!
नसती आशा मनिं धरुनी   उगाच झुरसी कां म्हणुनी?"

निर्दय वच हें ऐकोनी   वसुधा कष्टी होय मनीं
दुःख आवरुनि परि वदते   " योग्य न वर जाणें कां तें?
योग्य नसे जर तें बाई   आग्रह तुज माझा नाहीं
परी तेथलें एखादें   फूल तरी मज धाडुनि दे
दिव्यत्वाचें
तेज तयाचें
मग कायमचें
सहजीं भारुनि टाकील   क्षणांत सारें भौंताल!"

पुन्हा तिचें हें वच भलतें ऐकुनि सुरबाला वदते–
–" ही तव इच्छाही फुकट सोडुनि दे तूं हें वेड!
येतां फुल तें भूवरती होइल बघ त्याची माती !
जड, दिव्यांचें मीलन तें शक्य नसे जड जगिं वसुधे !
म्हणुनी तूं ही
सोडुनि देई
वसुधे बाई
इच्छा मनिंची लवलाहीं लाभ त्यांत तिळही नाहीं."
दुःखित होउनि मनिं बहुधा हळूहळू बोले वसुधा–
" कोड एवढें पुरव गडे ! हेंच मागणें तुझ्याकडे."
चिंताव्याकुल सुरबाला अखेर वदली वसुधेला:–
दुःख टाकुनी दे आधीं पुरविन मग इच्छा तुझि ती !–
बागेमधचें
एकच वरचें
मधुवासाचें
धाडिन फुल मी तुजजवळी निवांत रात्रीच्या वेळीं ? "
सांगुनि इतुकें वसुधेला गुप्त जाहली सुरबाला
निद्रेची गुंगी सरली वसुधाही जागी झाली
पाहि सारखी सभोंवतीं दिसे न सुरबाला परि ती
वाटे कौतुक, नवल तिला प्रसंग स्मरतां हा सगळा
निद्रेमधला
पाहुनि अपुला
चाळा असला
लाज वाटली तिज हृदयीं प्रशांत रात्रीच्या समयीं !

* * * *

मध्यरात्रिच्या अवकाळीं   पाही वसुधा आभाळीं
तों वरुनी गळुनी पडली   तेजस्वी तारा खालीं !
वाटे तिजला हें वरलें   फूल सुंदर गळुनी पडलें !
परि येतां भूवरि खालीं   तेजाची माती झाली !
हातोहातीं
तेजाची ती
बघुनी माती
वसुधा चित्तीं विरघळली ! दु:खावेगानें थिजली

क्षणांत आठवली तिजला   स्वप्नांतिल ती सुरबाला
वचन तिचें मग तिज पटलें दु:खानें मन जड झालें
शक्य नसे जड, दिव्यांचा   संगम जगिं नवलाईचा
दिव्याठायीं विरण्याचें   व्यर्थ वेड तें जडतेचें
दिव्यापाठीं
जाया, जगतीं
धडपड मोठी
सजीव, निर्जिव जीवांची   अशी सदा चालायाची !

अक्षय जें चिच्चैतन्य   त्या चिच्चैतन्यांतून
हरघडि नयनां दिसणारें   वस्तुजात उपजे सारें !
जाया त्या उद्भवस्थानीं   धडपड त्याची सदा मनीं !
परि जडतेचा दृढ फांस   जडतेला खिळवी त्यास !
हें जडतेचें
व्यामोहाचें
रजोगुणाचें
पटल टाकतां झुगारुन   जड दिव्यीं होइल लीन !!

'ब्रह्म'रूप शिवचैतन्य आत्म्याचें वसतिस्थान !
जाया त्या वसतिस्थानीं आत्माही धडपडे मनीं !
परि जडदेहीं गुरफटुनी मुकतो जाया त्या स्थानीं !
जडतेची बसली गांठ सहजीं तोडाया बिकट !
मनोबलानें
चित्तशुद्धिनें
आणि ज्ञानानें
मिळवुनि दिव्याची जोड उकला मरणाचें गूढ ! ! !

मुंबई–फोर्ट,
१८ ऑगष्ट १९२४.

# प्रेमासाठीं मरण !—

[ या कवितेंतील कल्पना आंग्लकवि शेले याच्या 'Love's Philosophy'—या कवितेवरून घेतल्या आहेत; सदरील कविता माझे त्या वेळचे कॉलेजमित्र श्री. डी. एम्. देसाई यांना लिहून दिली होती. ]

[ जाति—चंद्रकांत

सरितेशीं मधुमीलन होई निर्झरहृदयाचें !
अगाध निर्मल रत्नाकर जो त्याशीं सरितेचें !

विशाल गिरिरायाचें मानस रमे नभःश्रीशीं
वात स्वर्गिचा तसाच रमतो गोड भावनांशीं

प्रेमळ रविकर प्रेमें बिलगे वसुधादेवीला
नवयौवन चंद्रिका डोलवी सागर-हृदयाला

एकएकटा नसे कुणी या अखंड दुनियेंत
प्रेमें रंगे जग जोडीच्या सुखसहवासांत !

प्रीतीची ही मोहन-जादू गुंगवि जगताला
तुझ्या प्रीतिची जादु तशी मम गुंगवि हृदयाला !

सुखकर तव सहवाससुखानें नटविन जीवन तें—
जिव झुलला, अशि गाउन वेडीं मधु आशागीतें !

दुर्दैवें या जन्मीं मुकलों ज्या सहवासाला
स्वर्गामधिं तरि जोड तयाची लाभो हृदयाला !

जिवंतपणिं जगताचा यास्तव निरोप घेवोनी
वाट बघत मरणाची, गाइन हृदयाचीं गाणीं !

मुंबई—फोर्ट,
१८ फेब्रुवारी १९२५.

# सवाल !—

[ गज्जल—जगाचे बंध कोणाला

जगाला गांजला जीव विसरला भावना-भाव
विरालें आंतल्या आंत मनाचें मूक संगीत
जगाची लागुनी आंच तडकतां प्रीतिची कांच
स्मृतीचे गोड पडसाद मनाला ऐकवेनात
जगाचें प्रेम नांवाचें ! नको तें नांव प्रेमाचें !
पसारा हा पुरा सारा जिवाला ना इथें थारा !
कशाची जाचणी लागे जीविताच्या मनामागें ?
कशासाठीं हृदय वेडें ? सुटेना गूढ हें कोडें
वासना-मोहगुंगींत कळेना विश्व-इंगीत !
जीविताचा व्याप नसता जिवाला या नको आतां !
जगाच्या रानिं जो लागे मनाच्या मृगजलामागें
जगामधचें त्या जिवाचें व्यर्थ जीणें निराशेचें
केतकीच्या बनामधुनी तशा माझ्या मनामधुनी—
सोडिल्या कां, अणी कोणीं विषारी नागनागीणी ?
जीविताच्या वेलिवरली कुणी जाईजुई खुडिली ?
फुलावी केंवि मग जगतीं उमलती गीतफुलवंती ?
फोडुनि अंतराळाला शोधुं का प्रीत-भावाला ?
प्रीतिविणें सुना जीव कुणा त्याची नये कींव !
अशा दुबळ्या, दीन जीवा जगानें जन्म कां द्यावा ?—
निराशेचा हा सवाल कोण जगिं या सोडवील ?

खानोली,
६ मे १९२५.

# मधुमीलन—

[ जाति–आनन्दकन्द

ब्रह्मांड भारणारी ,, बन्सी धरोनि अधरीं—
वृंदावनांत कान्हा काढी सुरांत ताना !
तो दिव्य गीतनाद भरला वनावनांत
फिरला दिशांदिशांत विरला चराचरांत !
नादेंच विश्वखंड मोदें डुले अखंड !
पडसाद शांत तिथला राधामनांत उठला
ऐकोनि गीत गोड लागे जिवास वेड
खोरीं, दरीकपारी सारीं फिरे बिचारी !
दाही बघे दिशांना कांहीं कुठें दिसेना !
मुखदर्शनीं भुकेला जिव भागला जिवाला !
मोहोनि दिव्य नादा रानावनांत फिरतां—
ती मुग्ध प्रेमबाला भागे क्षणाक्षणाला
त्या गोड गीतरंगीं अन् भावनातरंगीं—
रंगोनी अंतरंगीं तिज येई गोड गुंगी !
ती दिव्य प्रेमधुंदी लावी जिवास नादीं !
नादेंच गुंग झाली ! नादेंच शुद्ध हरली !
हा खेळ चित्तनयनीं बघतांच चक्रपाणी—
निमिषांत येइ तेथें तिज घे करांत मोदें !
त्या दिव्य शांत काळीं राधेस जाग आली
बघतांच कृष्णवदना तिज कांहिंही सुचेना !
मनमोहि कृष्णरूप करि तीस कृष्णरूप ! !
मग अर्पि त्याच ठायीं निज देह कृष्णहृदयीं ! ! !

धुळें,
२७ मे १९२५.

[library stamp: क्र. ४३५ ता. ७/८/२]

## चोरी !—

[ आर्ति—बालानन्द

ठेवा बाई मोलाचा माझा पंचप्राणांचा
दिसूं नये तो परक्याला म्हणुनी हृदयीं दडवीला !
रक्षण करणारे दोन माझे तेजस्वी नयन—
देखरेख होते करित एकसारखे सदोदित

❦ ❦ ❦

घरामागच्या बागेंत एकांतीं गाणीं गात—
नटुनीथटुनी मी सहज एके दिवशीं करिं मौज
होता तो आनंदमय प्रशांत रात्रीचा समय
वरती नीलाकाश खुलें !—स्वच्छ चांदणें त्यांत खुले
चोहिंकडे होतें शांत खालीं, वर आकाशांत
प्रकाशती वरती डौलें तेजस्वी तारकाफुलें !
तशाच नाजुक फुलवेली आनंदें डुलती खालीं
गंध फुलांचा सुखदायी हृदयाला सुखवी बाई
अशा मनोहर त्या ठायीं हर्षोत्कट मानस होई !
आनंदाच्या गुंगींत जिव माझा झाला शांत
परि एकाएकीं हृदयीं जिव बाई व्याकुळ होई !
प्रेममूर्ति गोजिरवाणी आली हांसत त्या स्थानीं
येतां ती नजरेजवळी क्षणांत ओळख मज पटली
हृदयचोरटा तो चतुर जीवाचा जोडीदार

गोंडस माझें मुख बघुन    मनांत झाला तल्लीन
वरचेवर मजला बाई    निरखुनि न्याहाळुनि पाही

लाजेनें बाई मेलें    हृदयीं कांहींशी भ्यालें
सुंदर इष्काचा चोर    मोठा बाई तो चतुर !

आला बाई चोराया    पंचप्राणांची माया
नयनांशीं थोडी थोडी    करुं लागे लाडीगोडी

मुक हितगुज क्षणभर करुनी नकळत वश करि त्यां दुरुनी
प्रीतीचे खेळुनि खेळ    लबाड पाडी त्यां भूल

डोळे ते साधे भोळे    भुलावणीला त्या फसले!
परि माझ्या भोळ्या जीवा    कळला नाहीं हा कावा

नयनींचे नाजुक पाश    करिति त्यास अंकित दास
अनुमति नयनांची घेई    आणि शिरे हृदयीं बाई

हृदयहि तें साधें भोळें    लबाडास त्या वश झालें
चित्तचोर मग हळुच करी    पंचप्राणांची चोरी

लुटतां पंचप्राणाला    विसर जगाचा मज पडला
परि ही हृदयाची चोरी    जगास सांगाया चोरी !

चतुरी चोराची न्यारी    अंतरंग गुंगविणारी !
चोरीची या तिळभरही    चोराला वार्ता नाहीं !

परि ज्याची झाली चोरी    चोर दिसे त्या सामोरी !
या नाजुक चोरीपायीं    सुचे रुचेना मज कांहीं
सजा काय या चोरीला ?    सवाल हा मम जगताला !

धुळें,
३० मे १९२५.

# सौंदर्य !—

[ जाति–चालानन्द

अक्षयताहृदयावरलें  हें सुंदरतासोनुकुलें
सृष्टीच्या अंगाभौंतीं  नाचे, खेळे, करि गमती
पानांच्या पदराआड  हंसत हळुच लपवी तोंड
पुष्पांचा घुंगुरवाळा  करि पायीं रुम्झुम् चाळा
दुग्धामृत चैतन्याचें  पिउनी नाचे मन त्याचें
मुलाफुलांची नाजुकता  अरुण, उषेची मोहकता—
भूमातेची वत्सलता  आकाशाची अनंतता—
रुचिर खेळणीं घेउनि हीं  विश्वांगणिं खेळत राही
द्वेष, पाप, हेवा-दावा  ठाउक ना त्याच्या जीवा
दिव्य असा गोंडस बाळ  कां न विश्वमन झुलवील ?

❁ ❁ ❁

दिव्याची, सौंदर्याची  ओढ जीविता कायमची !
दिव्य वसे सौंदर्यात !—  सौंदर्यहि तें दिव्यांत !
दिव्य जिथें, सौंदर्य तिथें !—भेदाभेद नसे तेथें !
स्वर्गधरामीलनस्थान  तें यांचें क्रीडास्थान !
देइ मना सौंदर्य-सुख  ईशप्राप्तिहुनि तें अधिक
सौंदर्याच्या धुंदिगुणें  स्थिरचर हो वेड्यावाणें
मंदस्मित सुंदरतेचें  करि विस्मित मन जडतेचें !
सुंदरतातेजामागें  धांवाति जडताकण वेगें !

सौंदर्याचें जें स्थान चराचराचें तें गान
सुंदरतेचें संगीत सदा रहावें गुणगुणत—
आस एक ही हृदयाची परोपरीची, कायमची
जीवन सौंदर्यावीण मरणचि तें मरणावीण
स्फुरती सुंदरतागाणीं दिव्याच्या अंतरांतुनी
झुळझुळता सौंदर्यझरा दिव्याच्या उधळी धारा !
चिदानंद सुमनें फुलतीं फुलती मग हृदयाभोंतीं.

सौंदर्यें खुलला जीव ! सौंदर्यें झुलला जीव
सौंदर्यें जागोजाग विश्वाची फुलली बाग
वर, खालीं, इकडे, तिकडे विश्वहृदयिं सौंदर्य दडे !
सुंदरतेची ही माया हुडकाया इच्छा हृदया !
या नसत्या नादापायीं विश्रांती हृदया नाहीं !
पुलकित होउनि मनोमय डुले विश्व सौंदर्यमय !
वृक्ष, वल्लरी, शैल, शिला गाती तीं सौंदर्याला
फुलें, पांखरें, जललहरी सौंदर्यें नटलीं सारीं
रविकर, तारे, ग्रहगोल सौंदर्याचे हे खेळ !

बघतां सौंदर्या तुजला वेड लागतें हृदयाला
वाटे, तुजला घेवोनी भटकावें रानोरानीं

नित्य तुझ्या सान्निध्यांत   लाभे मज दिव्यानंद !
दास तुझा मी होईन   स्वर्ग भूवरी आणीन
चराचराला झुलवीन   ब्रह्मांडाला डुलवीन !
मग माझ्या हृदयामधुनी   स्फुरतिल दिव्याचीं गाणीं
गाण्यांनीं त्या बेमान   असतां मज येवो मरण !
मरतां, मरतां परि मजला   भेटूं दे सौंदर्याला !!
मरणोत्तर सौंदर्यांत   विरुं दे ही जीवनज्योत !!!

धुळें,
१ जून १९२५.

# विधवेचें स्वप्न !—

[ जाति–अंजनीगीत

सहज बाइ सुखशयनावरतीं
निजलें होतें मी एकांतीं
माझ्या 'फुटक्या कपाळा'चि मज शुद्धीही नव्हती !

निद्रित असतां चिरसुखदायी–
स्वप्न एक मज पडलें बाई
स्वप्न विरालें ! परी तयाची स्मृति कायम राही !

लपत, छपत, मधु हांसत गालीं
तरुण हळुच कुणि येई जवळी
निरखुनि बघतां क्षणांत बाई ओळख मज पटली !

मूर्ति मनोहर माझ्या पतिंची—
दिसतां खुलली वृत्ति मनींची !
स्मृति मग होई सहज सुखाची मज गतकाळींची !

प्रियकर माझे पति त्याकाळीं
आले बाई माझ्याजवळी !
कर हातीं मम धरुनी, घेती मज हृदयाजवळी !

पतिच्या हृदयाचा सुखदायी—
स्पर्श देहिं या होतां बाई—
मुग्ध कल्पनातरंग कांहीं उद्भवले हृदयीं !

पतिच्या सुखसहवासा मुकलें—
मन माझें या नादीं रमलें !
परी सुखाच्या ऐनभरामधिं जागी मी झालें !

स्वप्न सुखाचें निद्रेमधलें—
सौख्यतरंगें उद्भवलेलें !—
दुर्दैवानें क्षणांत बाई जागेपणिं विरलें !

अशीं सदोदित कांहीं कांहीं
स्वप्नें पडतीं मज सुखदायी !
परि नच नशिबीं स्वप्न सुखाचें !– सुख स्वप्नाचेंही !

अनाथनाथा हो भगवंता !—
अभागिनीला कां हो छळतां ?
जागेपणिंचा जाच जिवाला नको, नको आतां !

पतिसहवासीं रमल्या हृदया—
पतिविण वाटे जीवन वायां !
नाहीं उरली जिवास आतां जीवाची माया !

प्रियकर पतिच्या पवित्र प्रेमीं
तन, मन माझें अर्पियलें मीं !
परि मज टाकुनि गेले बाई हृदयाचे स्वामी !

भयाण जगिं या पतिप्रेमाविण—
अजाण मी कशि कंठूं जीवन ?
नाहीं नशिबीं देवा ! आतां सुख मरणावीण !

पतिच्या सहवासाविण सारा
व्यर्थ जगाचा मोहपसारा !
नाहिं जिवाला जगिं या आतां तिळभरही थारा !

आतां यापुढती कधिंकाळीं—
देवा ! पतिच्या पायांजवळी—
जायाचें या अभागिनीच्या आहे का भाळीं ?

" जगन्नायका ! दीनदयाळा !
एकदांच मज अभागिनीला—
त्या पायांचें दर्शन घडवा ! "—विनवी ही अबला !

धुळें,
११ जून १९२५

# वेड !—

[ जाति—चंद्रकान्त

प्रीतीच्या फुलबागेमधुनी मजेत हिंडावें
सुंदरतेच्या फूलपांखरांमागें धावावें

दिव्याच्या फुलवेलीवरचीं सुमनें तोडावीं
सत्याचीं मनिं स्वच्छंदानें मधुगीतें गावीं

अज्ञेयाच्या खेळगड्याशीं खुशाल खेळावें
चिरंतनाच्या हिंदोळ्यावर मग झोंके घ्यावे

शून्याच्या परतीरीं बैसुनि ऐकत दिग्गाना—
स्वानंदाच्या वेणूवरती काढाव्या ताना

चैतन्याच्या वाजीवरती बैसुनि बिनधोक—
ब्रह्मांडाचें गांठावें मग अखेरचें टोंक

भविष्यतेच्या हरित तृणाच्या वनांत हिंडावें
भूतकाळच्या थंडगारशा जलांत डुंबावें

दिनरजनीची झांज घेउनी अवनी डुलवावी
रविचंद्राच्या चिरकलहाला मुठमाती द्यावी

अनंततेच्या अफाट, उघड्या तळ्यांत उतरावें
स्वार्थ, मोह हे पाश मनाचे त्यांतचि बुडवावे

रविकिरणांचे पदर घेउनी गुंफावा गोफ
संध्यासमयीं तसेंच घ्यावें संध्येचें रूप

अवकाशाच्या विमानांतुनी आकाशीं जावें
तारांसंगें रास खेळुनी चंद्रा हिणवावें

प्रात:काळीं उषा होउनी रविला झुलवावें
झुलवुनि झुलवुनि प्रेमें त्याला हळूच बिलगावें

आणिक त्याच्या दाहक स्पर्शें विरघळतां प्राण
खालीं यावें भूमीपाशीं हिमकण होऊन !

फुलाफुलांच्या हृदयामधुनी लपत छपत जावें
मोत्यासम त्या कोंदणांत मग तेजें चमकावें

चमकत चमकत अखेरीस मग मातींत मिसळावें
मातीच्या त्या थडग्यामधुनी ब्रह्मपदीं जावें

ब्रह्मानंदीं जीव गुंगतां थयथय नाचावें
मायमाउली आदिशक्तिच्या अंकीं झोंपावें !—

वेड एक हें परोपरीचें माझ्या हृदयाचें—
पुरवा इतुकें घेउनि देवा ! मोलहि प्राणांचें !

धुळें,
७ जुलई १९२५.

# हृदयाची तळमळ!—

[ जाति—भूपतिवैभव

मी कोण, कोठुनी, कशास आलों येथें—
ही तीव्र जाचणी जाळितसे हृदयातें !

कुणिकडुन कुणिकडे आहे मज जायाचें
हें गूढ सारखें मनांत माझ्या नाचे !

पाकळ्या कोंवळ्या हृदयगुलाबामधल्या—
कां, कुणी विषारी कांट्यांनीं कुसकरिल्या ?

हृदयाचें माझें बीन लाख मोलाचें
कां सूर काढितें भयाण नैराश्याचे ?
मनिं लागावें जो बोल दिव्य बोलाया
कां तोंच लागते हुरहुर माझ्या हृदया ?
अंधार चहुंकडे भरला माझ्या हृदयीं
कां प्रकाश नाहीं शांतीचा तिळभरही ?
ही ओढ मनाला जावें दिव्यामागें
अज्ञानपाश परि कां मज ओढी मागें ?
निर्जीव मनाचें मृत आशांचें प्रेत—
हृदयाच्या थडग्यामाजी आहे कुजत
थैमान घालिती भुतें स्मृतीचीं तेथें
विस्मृतिचें शिकवा रामनाम मज कुणि तें !
भोंवतीं कोंवळी हिरवळ सुखस्वप्नांची—
उगवुनी वाढवी शोभा त्या थडग्याची !
आघात जगाचे तुडविति पायाखालीं—
ती जागा तिथली हिरवळिनें फुललेली !

मृत देहामधुनी निघतां आत्माराम
गांठील कधिं तरी चिरसौख्याचें धाम !

मृत आशांमधुनी सुटतां आशाप्राण
होईल तसें का ईप्सित त्यांचें पूर्ण ?—

ही रुखरुख लागे माझ्या मृत आशांना !
कुणितरी तयांना आश्वासन तें द्याना !

जंजाळ नको हा संसाराचा आतां
जाळती मनाला नसत्या व्याधी, चिंता !

मज जगताचा या पुरता आला वीट
दाखवा कुणी मज चिरसौख्याची वाट !

निःसार असे हा सृष्टीचा संसार !—
चैतन्यसागरावरची बुद्बुदलहर !

हें जीवन जगिचें मोहस्वप्न मायेचें !—
जायाचें आहे विरून तें कायमचें !

मरणानें येतां जागेपण जीवातें
हें मोहस्वप्न मग अनंततेमधिं विरतें !

* कीं जीवित अपुलें आहे ऋण मरणाचें
दो दिवसांनीं तें अखेर फेडायाचें ?

* आयुष्यघुमट हा बहुरंगी कांचेचा—
* करि दूषित शीतल प्रकाश चैतन्याचा !

* मरणाचा पडतां अखेर वरती पाय
* मग होतो त्याचा बघतां बघतां विलय !

मरणाच्या संगें तुडवुन जीवित-चढण
जीवात्मा गांठी चिद्विश्रांतिस्थान !

मज घाना देवा ! वाटाच्या मरणाचा
दावील मार्ग जो अक्षय चैतन्याचा !

भोपळा भ्रमाचा देवा हा जगण्याचा—
जाउंदे एकदां फुटूनी तो कायमचा !

नैराश्य, क्लेश हीं मुळिं जेथें नाहींत
कुणितरी मला हो न्याना त्या जगतांत

पेरीन तिथें मी मृत आशांचें बीज
वाढेल रोपटा अंकुर फुटूनी रोज

मग त्याचा होइल हळू हळू तरुराज
मी बसेन तेथें विश्रांतिस्तव रोज !

चहुंकडे तयाचीं फळेंफुलें उधळीन !
मग त्रिभुवन सारें जाइल आनंदून ! !

आनंदभरें त्या माझ्या हृदयामधुनी
स्फुरतील सारखीं चिरसौख्याचीं गाणीं ! ! !

[ * या ओळींतील कल्पना आंग्लकवि "शेले" याच्या "अॅडोनीस" या काव्यांतल्या खालील ओळींवरून घेतल्या आहेतः—

*........deth, who lends what life must borrow.
*Life, like a dome of many-coloured glass,
Stains the white rediance of eternity
Until death tramples it to fragments.—

धुळें,
१५ जुलई १९२५.

# फुलांची माळ—

[ जाति—चंद्रकांत

[ या कवितेंतील मध्यवर्ति कल्पना कै. " गोविंदाग्रज " यांच्या "चेंडू" या कवितेवरून सुचली आहे. ]

बाळ तान्हुलें, गोजिरवाणें प्रेमाचें फूल !
हंसे, बागडे मधुर बोबडे बोलुनियां बोल !
चिमण्या हातीं घेउनि वाळा दुडुदुडु धांवतसे
चिमण्या पायीं घुंगुरवाळा रुम्‌झुम् वाजतसे !
बसलीं होतीं जवळच त्याचीं चिमणीं भावंडें
चिमणे त्यांचे चाळे, करिती विश्वाला वेडें !
घेउनि हातीं फुलें, आपुल्या भावंडांजवळ—
बहीण त्यांची गुंफित होती सुंदरशी माळ
फुलें मनोहर पाहुनि नाचे हृदय तिचें मोदें !
अपुल्या मग ती भावंडांना वदली आनंदें:—
" पहा फुलें हीं सुंदर, यांची किति गोंडस कांती
मधुर तयांच्या वासें अमुचीं मानें कीं हरती ! "
भाउ तिचा तो बोले—" ताई ! बाळ आपुलें हें—
तुझ्या फुलांहुनि अधिक खचितची सुंदर बघ आहे !"
" होय ! भाउ ! रे !"—वदली ताई, " जगिं कोणालाही—
जिवंत फुलल्या या सुमनाची सर येणें नाहीं !

स्थळ प्रत



दो दिवसांनीं सुकतिल, गळतिल सारीं तीं सुमनें
परि अपुलें हें फूल सारखें फुलेल जोमानें ! ”
माडीवरुनी पाहत होतों आम्हीं हें सारें
बाळ आमुचें खुद्‌कन् हंसलें जणुं कळुनी सारें !
विचार भलते आले माझ्या त्यावेळीं हृदयीं—
साध्या भोळ्या बालमनाला जे शिवले नाहीं !
विचारव्यापृत वृत्ति मनाची उदासीन झाली !
स्तब्ध पाहुनी मजला, तीही हृदयीं बावरली !
व्याकुळ झाली पाहुनि माझ्या फरक वृत्तिमधला
प्रश्न करी मज, बिलगुनि प्रेमें माझ्या हृदयाला:—
“ वृत्ति आपुली एकाकी अशि उदास कां झाली ?
कां आनंदी मुद्रा अपुली झाली दुर्मुखली ?
पहा ! गडे ! जिवाचें अपुलें हें चिमणें फूल !
हांसुनि, खेळुनि पाडी माझ्या हृदयाला भूल ! ”
“ खरंच लाडके !”—वदलों मीही,—“ ही आहे भूल !
दो दिवसांनीं गळुनी जाइल हें चिमणें फूल ! ”
हात ठेवुनी तोंडावरि ती गहिंवरुनी म्हणते—
“ नका गडे ! हो ! बोलूं असलें कांहीं तरि भलतें ! ”

दिवस लोटले असेच कांहीं झाल्या गोष्टीला
प्रसंग कायमचा हा अमुच्या स्मरणांतुनि गेला

भावंडें तीं खेळत होतीं एक दिवस तेथें
बाळ तयांचें धांवत होतें तसेंच आनंदें !
आम्हीं दोघे तसेच होतों पाहत तो खेळ !
परि दुर्दैवें नव्हता तेथें अमुचा तो बाळ ! !
गतकाळींच्या दुःखस्मृतिनें मन येतां भरुनी
वाहुं लागले अश्रु सारखे मम नयनांमधुनी !
अश्रु पाहुनी माझ्या नयनीं गहिंवरली तीही !
"परस्परातें मिठी घालुनी रडलों दोघेंही !!!"

धुळें,
१९ जुलई १९२५.

# मी माझा आहें राजा ! —

[ जाति—बालानन्द.

[अपूर्ण, व्यवहारी जग व ध्येयवान् मनाच्या भराऱ्या यांची सांगड कशी घालणार ? शेवटीं त्या 'मनाच्या मृगजळा'मागें लागलेल्या भावनाप्रधान मनाला या भयाण नैराश्याच्या वातावरणांत बेफिकीर मिजाशीवृत्तीनें वागल्यावांचून गत्यंतरच नसतें. ]

मी माझा आहें राजा !
परी न मम गाजावाजा !

हृदयाचें साम्राज्यपद
करि अर्पण मज भगवंत !
विश्वबंधुतामुकुट शिरीं
खुले, जसा रवि जगावरी !
शांति, सत्य, सौंदर्य, कला
हीच लाभली प्रजा मला
विवेकमंत्री महशूर !
विकाररिपुला करि ठार
मधुर भावना– मुग्ध कल्पना– तरंग नाना
नाचरंग नटुनी करिती
पंचप्राणांच्या भौंतीं !

आनंदाची फुलबाग
फुले, खुले जागोजाग !
निर्झर निर्मल झुळझुळती
नवलाचीं गाणीं गाती !

फुलती नाजुक कळ्याफुलें
वाऱ्यावरि घेतीं झोले
डोले स्थळ तें प्रेमखुळें
करुनी नवरंगी चाळे
या बागेचें— या जागेचें— या जगताचें
मोलाचें साम्राज्यपद
करि अर्पण मज भगवंत !

प्रीतीचा पंचीप्यारा
आहें मी हो पुरापुरा !
बराबुरा हा भेद पुरा
यास्तव मजला खराखुरा !
नाजुकतेची मृदु शेज
विश्रांतीस्तव असे मज
दिव्याच्या संगीतांत
जीव करी जडता-अंत !
पूर्णत्वाला— चैतन्याला— भेटायाला
मिळो मनाला कधीं तरी
धडपड यासाठीं सारी !

मुग्ध, मधुर कवितानार
जीवाची माझ्या प्यार !
घेउनि तिज हृदयाजवळी
खेळ करी वेळोवेळीं !
कधिं मजला सोडुनि जाते !
प्रेमें कधिं हृदया भिडते !

प्रिय माझे कविताराणी
प्राण वाहिले तव चरणीं !
काव्य-सुंदरी– चंचल भारी !– विनाति तुज तरी
भाव मनींचा उघडोनी
प्रेमें मज अपुला मानीं !

घुमुंदे जीवनकुंजांत
दिव्याचें कोकिळगीत !
सुंदरतेचीं सुबक फुलें
पुरीं डंवरलीं दंवामुळें !
*'दंव वरचें चुंबुनि घ्यावें !'
हांसत मग गाणें गावें !
छंद जिवाला हा एक !
हेंचि जिवाचें शांतिसुख !
तें मज मिळतां– माझी सत्ता– नमविल जगता !!!
मी माझा आहें राजा !
परी न मम गाजावाजा !

[ * 'सौंदर्याच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें '–बालकवि ]

मुंबई–गिरगांव,
२१ जानेवारी १९२६.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५५०७

# दंव—

[ जाति—अंजनीगीत.

प्रीतिफुलाच्या मधुर परिमलें
उषा—रवीचें मानस फुललें
परस्परांशीं करिति मन खुलें—
संधी साधुनियां !

दंव सोनुकुलें देवाघरलें
उषारवीचें बाळ तान्हुलें—
नउनवसांनीं जन्मा आलें—
शुभ प्रातःसमया !

फुलाफुलांच्या नाजुक हृदयीं
स्वच्छंदें करि जो जो गाई
प्रेमळ आई प्रेमें गाई
अंगाईगीत !:—

"सुमनांच्या या साम्राज्यांत
आहे जायाचें तव जीवित
नाजुकतेची धरुनी संगत
बस गुंगत जगतीं !

दो दिवसांचें तव हें जीवित
नको घालवूं असेंच व्यर्थ !
कांहिं चांगलें करुनि जगांत
ठेव नांव मागें !

गुणी फुलांची सोबतसंगत–
तुझ्या सदोदित बघ नशिबांत !
पसरो त्यांसम कीर्तिसुगंध
तव आयुष्यांत ! ”

मातेचे हे प्रेमळ बोल–
कळले बाळा कीं तात्काल;
“ जगांत माझें नांव उज्ज्वल
करीन मी आई ! ”

करुनि प्रतिज्ञा हीच मनांत
दिवस कंठि सुम-साम्राज्यांत
मिळतां तेथिल निर्मल संगत
निर्मल तो बनला !

सत्संगतिनें थोर पदाला
क्षणांत देवबालक तो चढला !
नभिंच्या चंद्रासम तो गमला
पुष्पपाकळ्यांत !

भोंवतालची मधु वनराई
तेजें त्याच्या गुंगुनि जाई !
टकमक टकमक पाहत राही
वरचेवरि त्याला !

“ सुमनकोंदणीं सुबक रत्न हें
तेजें अपुल्या तळपत राहे !

चमकतें तेजें असे सदा हें
राहिल का देवा ?"

जाइ-जुई, वनराई, वेली
हेंच बोलती सांजसकाळीं
शुद्ध जिवाची नाहीं उरली
चराचरालाही !

हाय ! हाय ! पण सुमन गळालें
देवबालकही मातिंत पडलें !
मातिंत पडतां जीवित झालें
मातिमोल त्याचें !

सुसंग चढवी महत्पदाला !
कुसंग नेई अधोगतीला !
म्हणुनि जीविता ! सांगणें तुला
" सोड कुसंगतिला ! "

मुंबई—गिरगांव,
२२ जानेवारी १९२६.

स्थळ प्रत
क्रा. नं. ४३५
ता. ७७२
ग्रा. नं.

# प्रेम आणि मरण—

[ चाल—आजि अक्रुर हा नेतो

नटुनीथटुनी आली हो आभाळीं मेघाची स्वारी काळी !
त्या नाजुकशा प्रेमळ हृदयामधुनी प्रीतीचें खेळे पाणी
वनवायूच्या नाजुक झुळुकेसरशीं भयभीत होइ हृदयाशीं !
जीवाची जिवलग राणी—
शोधाया, वेड्यावाणी—
गगनाच्या रानामधुनी—
तो प्रेमपिसा हिंडे प्रेमासरसा आशेचा धरुनि भरंवसा !

तों आभाळीं सहजीं दिसली त्याला लखलखती बिजलीबाला !
बघुनी नयनीं सुंदरतेची पुतळी चित्तवृत्ति व्याकुळ झाली !
सौंदर्याच्या जहरी मोहनलहरी भिडल्या मग थेट जिव्हारीं !
ती नखरेबाज, छिचोर—
नाचरी, नभींची पोर—
सौंदर्यमदें शिरजोर—
मनिं होवोनी, गगनीं चमकत जातां करि व्याकुळ त्याच्या चित्ता !

बिजलीप्रेमें झाला वेड्यावाणी लागली जिवाला झुरणी !
जगिं कांहींही सुचेरुचेना त्याला ! जिव त्याचा जगता मेला !
गगनींची ही चटकचांदणी नटवी अशि ज्या त्या झुलवी, भुलवी !
" करि मन जें व्याकुळ, तरल—
तें स्पर्शसौख्य बिनमोल—
क्षण एक जरी लाभेल—
या प्रीतीच्या पंचप्राणांवरून ओंवाळिन पंचप्राण ! "

इतुकें बोले, आणि बघे आभाळीं    तों हंसली बिजली गालीं !
हांसत जाई वेगानें तिजपाशीं    त्या प्रेमावेगासरशीं
हळु प्रेमानें घ्यावें तिज करपाशीं    भिडला तो म्हणुनी तिजशीं !

हृदया ती असतां भिडुनी
हृदयाचें झालें पाणी !
अश्रूंनीं भरल्या नयनीं

वेड्यावाणी पाहि सारखा गगनीं    हुडकाया जीवन-राणी !
परि नाहिं कुठें दिसली त्याला त्याची    मनमोहन राणी मनिंची !
उज्ज्वल त्याच्या प्रेमाला ती पोर    लाथाडुनि गेली दूर !
धुळधाण करी त्याच्या आयुष्याची    चवचाल पोर ती नभिंची !

ती जळती प्रीति-ज्वाला
कडकडुनी भिडतां त्याला
तो तडफडला, मरुनी पडला !

मरतां मरतां दुःखित होउनि हृदयीं    वदला तो कांहीं कांहीं—

"मम नयनींचे आंसव हे दुःखाचे    मज लाखाच्या मोलाचे !
हे अश्रूंनो ! जाउनि सांगा आतां    ही दुःखकथा तुम्हि जगता !
वेड्या जगता ! विसर गड्या ! तात्काळ    प्रेमाचे वेडे खेळ !

प्रीत हें केतकीफूल !
जीवाला पाडी भूल !
परि त्यांतिल नागिणगरल—

हृदयीं भिनुनी व्याकुळ होतां प्राण    नंदनवन बनतें रान !

मुंबई—गिरगांव,
२७ जानेवारी १९२६.

# चांदण्या—

[ वृत्त—तूणक

लताकुंज बहरले ! हांसली कळ्याफुलें !
वासहीन हीं फुलें तेज उधळती खुलें !
सुबक रत्नमाणकें करित चमक कौतुकें—
गगनपाकळ्यांवरी शोभती दंवापरी !

भव्य गगनअंगणीं संवगड्यांस घेउनी—
विश्वमाय सोनुली खेळण्यास धांवली !
हंसत हंसत अंबरीं येइ स्वर्गसुंदरी
तिची दंतपंक्ति ही खुलवि दिशा दाहिही !

रत्नजडित आसनीं निशानाथ येउनी—
प्रेमविकल बैसला ! अंतरंगिं गुंगला !
त्याचिया सभोंवतीं स्वागतार्थ धांवती—
हंसत नटुनि मुरडुनी दिव्य अप्सरा कुणी !

निशापायपैंजणीं नर्तनिं, जे नुपुरमणि—
तुटुनि गळुनि सांडती अकस्मात भोंवतीं
सूर्यबाळ तान्हुला दृष्टिआड जाहला !
म्हणुनि आदिमाउली ढाळि आंसवाञ्जली !

चेतना नळींतुनी उडविले नभीं कुणी
मोहफेंस बुडबुडे सहज काय एवढे ?

चंद्र-कृष्ण घेउनी    गोपिबालिका कुणी
रासखेळ खेळती    कीं परस्परांमधीं ?

कीं गगनवाळुमधीं    शिंपल्या चकाकती ?
गगन-दिव्य पाहुनी    शांतता स्फुरे मनीं !

निशानयनचमक ही    भुलवि श्रांत हृदयही !
दिव्य जें जगीं असे    पिसें लावि तें असें !

मुंबई-गिरगांव,
३१ जानेवारी १९२६.

# फुलबाला ! —

[ जाति--चंद्रकान्त

## निःश्वास १ ला

सुंदर एका बागेमधल्या कारंज्याजवळ
फुलली होती सुबक फुलांनीं नाजुकशी वेल
त्या वेलीच्या टोंकावरचें, सुंदर वासाचें—
फुल, झुळझुळत्या वाऱ्याच्या मृदु हृदयावरि नाचे
गोंडस कांती अंगावरती दिव्याचें तेज—
उधळुनि, लावी वेड जगाच्या हृदयाला रोज
जोडिस सौंदर्याच्या त्याचा सुखकर आमोद
सुरस, काव्यमय संगीतासम देइ मना मोद
लतिका-झोल्यावरि बसुनी ती सुंदर फुलबाला
नाजुक हुरहुर लावि जगाच्या प्रेमी हृदयाला
वाऱ्याजवळी शुद्ध मनें ती हृदय करी उघडें
म्हणुनि तिचा सहवास सहजची घडिघडि त्यास घडे
परस्परांमधिं जडलें नातें भावाबहिणीचें
पापी जग परि अर्थ मनामधिं करि भलते त्याचे
सांजसकाळीं भाषणबोली परस्परांमधली—
बघुनि जगाचीं हृदयें काळीं द्वेषानें भरलीं !
अपूर्णता, अज्ञान सारखें वसतें ज्या हृदयीं
परोत्कर्ष द्वेषाला त्याच्या कारण तो होई !

सूर्यकिरण परि तिमिराचा करि ज्यापरि विध्वंस
सद्गुण त्यापरि करी अखेरिस पापाचा ऱ्हास
रम्य मोहनें सौंदर्याचीं दिव्यांनीं भरलीं
दिव्यत्वाप्रत नेती हृदयें पापानें मळलीं
विरोध करि जें अपूर्ण चंचल अक्षय पूर्णाशीं
नाश पावुनी मिसळुनि जाई अखेर पूर्णाशीं !

## निःश्वास २ रा

नित्य पहांटे उठुनि होइ ती प्रभुचरणीं लीन
भावभक्तिनें वंदन करुनी करि प्रातःस्मरण
ईशचिंतनीं रंगुनि, पडतां देहाचा विसर
दंवरूपानें गालिं ओघळे अश्रूंची धार !
भावभक्तिच्या दिव्यानंदीं रमल्या हृदयास
मर्त्य जगाच्या उलाढालिचा कशास हव्यास ?
भेदित, भेदित अनंततेचें अफाट आवरण
दिव्याच्यामागें जें लागे दिव्यासक्त मन—
अशा मनाचें जिणें जगींचें केवळ नांवाचें
गळुनी पडल्या नक्षत्रासम मातीमोलाचें !
अशा मनाला कशि लाभावी शांतीची जोड ?—
कोण जगामधिं अशा मनाचें पुरविणार कोड ?
याच कारणें फुलबालेचा बेफिकिरी बाणा
केवळ वेड्यावाणा वाटे वेड्या जीवांना

ज्ञानबलानें अपरोक्षाचीं भेदुनि आवरणें
गवसणि आकाशा घालोनी परोक्षांत शिरणें—

निसर्गहृद्‌यामधीं सतत जी घडामोड चाले
काव्यदुर्बिणीमधुनी त्याचे बघणें नव चाळे—

ह्याच जगीं ह्व्यास जयाला ह्याच मनीं ध्यास
अशा मना बांधील कसा जगिं जडतेचा पाश ?

अशक्यतेचीं मोहनलेणीं ल्याया धडपडुनी
अपूर्णतेचीं उदासवाणीं गावीं रडगाणीं—

फुलबालेच्या नसानसांतुनि वृत्ति हीच भिनली—
अशा जिवाला सौख्याची मग मोकळीक कुठली ?

## निःश्वास ३ रा

कारंज्याचें तुषारपाणी सांडे जें खालीं
जमिनीवरती स्वच्छ तयाचा झरा बने जवळी

त्याच झऱ्याच्या आरशांत ती वेणिफणी करुनी
घेइ थंडसें कारंज्याचें अंग धुण्या पाणी

अंग धुवोनी झाल्यावरचा वेळ तिचा, कांहीं—
विश्वामधलीं गूढ रहस्यें उकलण्यांत जाई !

नाजुक गाणीं स्वैरपणें मनिं गुणगुणुनी कांहीं
स्वच्छ झऱ्याच्या रुचकरशा त्या पाण्यावर राही

झोंप जराशी घेउनि नंतर वाऱ्याच्या संगें—
अध्यात्मज्ञानाच्या दैविक विचारांत रंगे !

क्षुद्र जगाची पाजी करणी, व्यर्थ बडेजाव
तशीच बडबड थोर पाहुनी विटे तिचा जीव

आणिक दुसरे विचार कसले येति तिच्या हृदयीं—
नाहिं जगाला जाणिव त्याची, नाहिं कुणालाही !

गूढ भयंकर विचार तात्त्विक ज्या वेळीं हृदयीं—
उसळुनि वेगें कलुषित करिती जीवन सुखदायी

अशा भयंकर समयीं जगतीं दुर्दैवी जीवें
पुढें कशावर नजर ठेवुनी जीवित कंठावें ?

मृत्यु तेवढा असे एक जगिं तयास आधार
कीं जो हलका करिल तयाच्या दुःखाचा भार !

एकलकोंडी 'फुलबाला'ही याच विचारानें
ढकलित होती पुढें आपुलें दुर्दैवी जीणें !

परी मुखावरि तिच्या कधिं कधीं आवेगासरसें
दिव्यत्वाचें तेज मनोहर स्फुरतांना भासे !

## निःश्वास ४ था

'फुलबाले'ची वृत्ति दिसे जरि अति आनंदाची
वाऱ्याच्या त्या चौकस हृदया भासे वरवरची

करणीसरणी चुकल्यावाणी आणिक बेफिकिरी
सतत पाहुनी मर्मीं त्याच्या घाव बसे जहरी !

देवाच्या राज्यांत रंगलें, दिव्यत्वीं रमलें,
जाइजुईच्या फुलावाणि जें सौंदर्य नटलें—

अशा बापुड्या नाजुक हृदया व्यर्थ गांजण्यांत
जगन्नियंत्या जगदीशाचा काय असे बेत ?

कीं आहे हें फळ गतकाळीं केल्या कर्माचें
पूर्वसंचितानुसार जीवा जगिं भोगायाचें ?

कांहिं कळेना अज्ञ मनाला ! वृत्ति बने वेडी !
कशीं सुटावीं अजाण हृदया हीं असलीं कोडीं ?

अनंत गूढें दडलीं असतीं जीं तेजापोटीं
कशि उकलाया समर्थ हो ती अंधाची दृष्टी ?

रवितेजांतुनि उद्भवलेल्या किरणांचे खेळ
अंधाराच्या कोत्या दृष्टिस कैसे दिसतील ?

वाऱ्याच्या मनिं हरघडि चाले विचारखळबळ ही !
सुख वाटेना जिवास त्याच्या यास्तव तिळभरही !

अशा समयिं मग विश्रांतीस्तव 'फुलवागे'संगें
चिरंतनाच्या तत्त्वचिंतनीं मन त्याचें रंगे !

नव्या कल्पना विषयावरि या प्रत्यहिं ऐकून
'फुलवाले'च्या ज्ञानाचा त्या वाटे अभिमान !

यास्तव साऱ्या जगामधीं ती सुंदर 'फुलवाला'
सर्व गुणांचा केवळ सांठा वाटतसे त्याला !

## निःश्वास ५ वा

रूप सजावट 'फुलबाले'ची अति चेतोहारी
भावमुग्ध हृत्सरसीं उपजवि अतिनाजुक लहरी !

देवाघरिं वरि स्वर्गाचाही तिज़वरि लोभ जडे !
नवल नव्हे मग मौतिचें जग जरि झालें वेडें !

रंजित होउनि हृदयीं प्रेमें अनुरागी अरुण
प्रात:काळीं येई बघाया 'फुलबाला'वदन

आकाशींचा गोजिरवाणा प्रेमळ रविराणा
अर्पायाला 'फुलबाले'ला निजकर सुमनांना-—

जाई जवळी हांसत हांसत गालांमधिं गोड
'फुलबाला' परि क्रोधें अपुलें फिरवितसे तोंड !

प्रेमास्तव तो फिरे नभाचें आडरान सगळें
सायंकाळीं जाइ घेउनी मुख हिरमुसलेलें !

वाऱ्यावरि मन उंच मनोरे बांधी आशेंत
परि कर्माचे भोग वेगळे ठरले नशिबांत !

अखिल जगीं या दुर्दैवाचे खडतर आघात—
टाळायाचे कुणा जिवाच्या आहे भाग्यांत ?

जरी निराशा हमेश जाळी हपापल्या हृदया
परी न चुकला 'फुलबाले'ला कधिं तो भेटाया !

दिव्यमय प्रेमाच्या स्वर्गिय वातावरणांत
मुठमाती 'मी'पणास मिळते एका निमिषांत !

'तूं, मी'ची, 'दे, घे'ची तेथें मुळिं भाषा नाहीं !
अद्वैत ब्रह्माच्या दिव्यीं जीव विरुनि जाई !

परास्पराकर्षणें वहरतां प्रीतीची बाग
दिव्यत्वाच्या मधुचैतन्यें फुले अंतरंग !

## निश्वास ६ वा

'फुलबाले'च्या सौंदर्याची ऐकुनियां कीर्ति
तसेच प्रेमळ कितीक मधुकर तिजभौतीं जमती

सहवासाची तिच्या धरुनियां आशा निजचित्तीं
मंजुळ गुंजारव प्रीतीचा तिजपाशीं करिती

'फुलबाले'ची गोजिरवाणी, मनमोहनमूर्ती
खेळतसे निशिदिनीं तयांच्या ध्यानिं, मनीं, चित्तीं !

येतां जातां विहंग थबकुनि मनिं आपोआप—
टकमक, टकमक बघत राहती 'फुलबाला'रूप !

वेडे बनती 'फुलबाले'चें मोहक मुख बघुन
घरट्यांमाजी जायाचें त्या मग कुठलें भान ?

दिन-रजनीचें मीलन होतां संध्यासमयाला
छटा मनोहर सौंदर्याची खुलवी गगनाला

हृदयंगम त्या संगमकालीं तेजस्वी एक—
संध्यातारक फेंकी तिजवर नयनींची फेंक

'फुलबाले'ला बघुनी खालीं गुंगुनि प्रेमरसें
वरुनि सुधाकर मुदें तिच्यावर निजकर फेंकितसे !

विश्व चराचर असें प्रीतिच्या दिव्यरसीं रमलें !
'फुलबाले'च्या सौंदर्यानें वेडावुनि गेलें !

स्वर्गिय प्रेमास्तव 'फुलबाला' मनामनांत जळे
रुचत नसत तिज प्रेमाचे हे वरपांगी चाळे !

दिव्य विचारांसंगें खेळे मन जें दिव्यमय
अशा मनाला क्षुद्र जगाची पर्वा ती काय ?
वरवर धांवे जें मन जाया चैतन्यामागें
चैतन्याविण नाहीं कसली हुरहुर त्यामागें !

## निःश्वास ७ वा

झुळझुळ गाणें गात मजेनें अपुल्या हृदयाशीं
आला वारा एके दिवशीं 'फुलबाले'पाशीं
'फुलबाला' फुलवेलीवरती आनंदें बसुनी
झोंके होती घेत गाउनी मंजुळशीं गाणीं
दुरुनि पाहुनी वाऱ्याची ती मुद्रा खुललेली
'फुलबाला' मनिं क्षणभर अपुल्या आनंदें हंसली
क्षणांत चटकन् वृत्ति हांसरी बदलुनियां अपुली
कसल्याशा अति गूढ विचारीं गढुनी ती गेली
फरक पाहुनी 'फुलबाले'च्या हा वृत्तीमधला
वाऱ्याच्या अति नाजुक हृदया गहिंवर तो आला !
कांहिं सुचेना त्या वेळीं त्या, मन व्याकुळ झालें
थोर उमाळा येउनि डोळे पाण्यानें भरले !
थांबुनि क्षणभर प्रश्न करी तो अपुल्या ताईला—
"सांग गडे! मज ताई, जें तव जाळी जीवाला !
एकसारखी गूढ चिंतनीं गुंगुनि हृदयाशीं
वेड्यावाणी काय एवढें हुडकित तूं असशी ?

उगाच नसता विचार करुनी व्याकुळ कां होशी ?
नसत्यासाठीं मनिं धडपडुनी उगाच कां झुरशी ?

आहे त्यामधिं सुख मानोनी रत व्हावें कार्यीं
जीवनसार्थक याविण दुसरें कशामधीं नाहीं !

इच्छा, आशा सतत लागली ही ज्याच्यापाठीं
नैराश्याचें भूत भयानक लागे त्यापाठीं !

यासाठीं निज कर्तव्यामाधिं जीवित खर्चोनी
सुखदुःखीं मन स्थिर ठेवावें जगांत सूज्ञांनीं !"

## निःश्वास ८ वा

स्तब्ध राहुनी ऐकत होती 'फुलबाला' सारें
विशेष कांहीं नाहिं वाटलें त्यांत तिला न्यारें !

अतर्क्य, अघटित जें जगिं भासे अज्ञ अशा हृदया
विशेष कांहीं वाटत नाहीं त्यांत सूज्ञ हृदया !

विचार कसला करुनि मनीं ती बोलाया लागेः—
"खरें भाइ रे, नसत्यामागें मन लागुनि भागे !

वरवर जाया इच्छुनि झुरणें मनिं नसत्यापायीं
मनोवृत्ति ही जिवंत असते जातिवंत हृदयीं !

अपूर्णतेची जाणिव होउनि, पूर्णत्वा जाया—
इच्छा होतां स्वास्थ्य मनाचें उरत नसे हृदया !

सत्य जरी हें, परि न धडपडे वरवर जो जाया
अशा जिवाचें मोलाचेंही जीवित जगिं वायां !

अपयश दोष न, परि मनिं हलकी इच्छा बाळगणें !
दिव्यत्वरसीं मन गुंगाविणें हेंच खरें जगणें !

नैराश्याचें दुःख जाळतें जरि हृदया भिडतें
आत्मिक प्रगती व्हाया जगतीं अवश्य जीवा तें !

अपूर्णतेची जाणिव झाल्या दुर्मुखल्या हृदया
जरुरि कशाची आणिक नाहीं उच्च पदा जाया !

आहे त्याहुनि वरवर जाया मनिं इच्छा होणें
उच्चत्वाच्या मधु उद्यानीं भटकत मनिं रमणें—

अशा भावमय दिव्य जीवनीं जीवित खर्चोनी
परमोच्च पदीं विलीन व्हावें हीच मना झुरणी !

जीवन माझें यास्तव सारें बनलें वरकरणीं
जावें विरुनी चैतन्यीं ही निशिदिनिं आस मनीं !"

## निःश्वास ९ वा

बोलुनि इतुकें मधेंच थांबे क्षणभर 'फुलवाला'
पाहत राही इतर फुलांच्या नवलांच्या लीला

तोंच अचानक एक सुवासिक तेजस्वी सुमन—
लतिकेवरुनी पडलें खालीं भूमीवरि गळुन !

दोघांचीही एके वेळीं दृष्टि तिथें गेली
सुमनाच्या त्या सुंदरतेवरि आश्चर्यें खिळली !

निमिषामधिं मोलाचें जीवित वायां गेलेलें—
पाहुनि दुःखानें वाऱ्याचें मानस हळहळलें !

परि 'फुलबाला' स्तब्ध जाहली प्रसंग हा बघुनी !
"मरणगूढ हें काय?"—तिच्या, हा विचार येइ मनीं—
वृत्ति तिची या विचारजालीं गुरफटुनी गेली !
विषण्ण छाया गांभीर्याची पसरे भौंतालीं !
प्रश्न करी 'फुलबाले'ला, हें पाहुनियां वारा—
"व्यर्थचि का हा मोहपसारा जगतींचा सारा ?
नाहिं भरंवसा तिळभर कसला, नाहिं मना थारा !
क्षणभंगुरतेचा हा सारा पोकळ डोलारा !
नाशवंत जर खचित असे हा सृष्टीचा खेळ
व्यर्थ सुखास्तव जिव कां खर्ची अमोलीक वेळ ?
मनोमृगजलामागें लागुनि साधाया स्वार्थ—
जीव धडपडे त्यांत एवढा काय असे अर्थ ?
मरणें हा जर जीवित-शेवट आहे ठरलेला
कशास जन्मा दैव घालितें जगांत जीवाला ?
वाट बघत सारखी सदोदित मरणाची चित्तीं
स्वस्थ बसावें वेड्यावाणी जीवानें जगतीं !"

## निःश्वास १० वा

वाऱ्याचे हे नैराश्याचे विचार ऐकुनियां
नवल वाटलें सूज्ञ अशाही 'फुलबाला'हृदया
क्षणभर दिसली विचारामधिं निमग्न झालेली
क्षणिं दुसऱ्या ती गांभीर्यानें भासे नटलेली !
एकसारखी मुख वाऱ्याचें टक लावुनि पाही
उत्सुकतेनें मधेंच लागे बोलाया कांहीं—

"कर्तव्याची जाणिव ठेवुनि मनामधीं जागी
जरी दिलें आयुष्य सार्थकीं जिव लावील जगीं—
जाच जाळता अपूर्णतेचा, नैराश्याचाही
जाळायाला अशा जिवाला समर्थ जगिं नाहीं !
आशाइच्छा-फळाफुलांनीं हृदयें फुललेलीं—
नैराश्याच्या आघातानें चिरडुनि पायदळीं—
दारुण संजीवनि दुःखाची मेलेल्या चित्ता—
माणुसकीची जाणिव देउनि जिवंत करि जगता !
निर्दय कांटे जसे वेढिती गुलाबपुष्पाला
तसेच कांटे दुःखाचे मम वेढिति हृदयाला !
वाट बघत सारखी मृत्युची दिन उरलेसुरले—
आयुष्याचे, पुढें ढकलणें नशिबामधिं ठरलें !
मृत्यु हेंच मज ध्येय एक या जगामधीं उरलें !
मोल जिवाला म्हणुनी नाहीं ! नाहीं सुख कसलें !
उजाड रानावाणी जीवन रुक्ष असें झालें !—
तरि चिरकालिक सुखप्राप्तीस्तव अवश्य हें सगळें !
आत्मिक प्रगती अधिक कराया, चिरसुख भोगाया
जन्म दुजा आवश्यक आहे जीवन्मृत हृदया !"

## निःश्वास ११ वा

बोलुनि इतुकें स्तब्ध जाहली क्षणभर 'फुलबाला' !
स्तब्ध बघुनि तिज क्षणांत तेथुनि वाराही गेला
दिव्य, कल्पनापूर्ण तिचे ते विचार ऐकुनियां
कौतुक वाटे साध्याभोळ्या त्याच्याही हृदया

दिव्य विचारांमाजी त्याचें मन गढुनी गेलें
सहज तिच्या दुःखाचें त्याला कारण मग कळलें !
"जन्मांतरिं तरि पूर्ण तिच्या त्या इच्छा होउनियां–
लाभो देवा ! चिरशांतीची जोड तिच्या हृदया !"
असें मनामधिं गुणगुणुनी तो आळवि देवाला–
"कुठें असो परि सुखांत ठेवा या 'फुलबाले'ला !"

दुसऱ्या दिवशीं वारा आला त्या जागेजवळी
परी तयाला 'फुलबाला' ती नाहिं तिथें दिसली !
पाही खालीं, तों ती दिसली गळुनी पडलेली !
दशा बघुनि ती तिची, तयाची वृत्ती बावरली !
दुःख उमाळा येतां बोले गहिंवरुनी–"देवा !–
अशा जिवाचा अशा तऱ्हेनें शेवट कां व्हावा ?"

ज्या मरणाचें दुःख वाटलें वाऱ्याच्या हृदया
तेंच जाहलें चिरसुखदायक 'फुलबाला'हृदया !
बिकट अडथळे दूर करोनी मरणानें सारे
गांठायाचें होतें तिजला ध्येय तिचें अपुरें !
जगामधुनि 'फुलबाला' गेली ! परि मेली नाहीं !
संक्रमणाला अवश्य आहे मरणावस्था ही !
नाहिं कशाला नाश जगामधिं ! नाहिं कुणा मरण !!
मरणस्थिति ही असे प्रगतिपर आत्मिक संक्रमण !!!

रत्नागिरी,
२ जून १९२६.

# हृदयाचें गीत !—

[ जाति–चंद्रकान्त

मानसमैने गाच गडे तूं–'हृदयाचें गीत' !
करितिल पंचप्राण तुला बघ अंतरिंची साथ !
जनामनाची सोडुनि आतां भीडभाड सारी–
अवकाशाच्या कणाकणांतुनि घुमव गीतलहरी !

❦ ❦ ❦

प्रणयप्रेरके ! प्राणात्म्याचा प्रणाम प्रेमाचा–
स्वीकारुनियां ऐक बोल हा जीवाभावाचा–
अंतरंगसारंगीवरती मधु प्रीती-गीत–
जीवित माझें शिकलें गाया तव सहवासांत !
नवनवतीचें तेज झुळझुळे अंगांगांतून
झुळझुळ वाहे गीत त्यापरी मनामनामधुन
त्या गीताच्या मंजुळ नादें जीवित–मन नाचे
नाच नाचतां भान हरपलें देहाजीवाचें !
प्रणयाचा नव वसंत फुलला गात्रागात्रानें
नाजुकतामंजरी बहरली नव्या नवाईनें
मोहकतेच्या लहरी फिरतां नयनींच्या रानीं
भावलता लागल्या झुलाया मनिंच्या उद्यानीं
सुंदरतेचा शरद् विहरतां नयनादिशांमधुन
प्रेमझरी झुळझुळूं लागली हृदयकड्यावरुन
झुळझुळ गानें झुललें पंचप्राणांचें फूल !
मोदरूप आमोद तयाचा झुलवी भौताल !

हृदयाकाशीं दिव्यत्वाची तेजोमय तारा—
नव तेजानें खुलवी डुलवी जीव-गोल सारा !

मांगल्याची मोहनमाया उघडचा नयनांनीं—
हृदयसंपुटीं शिरुनी पसरे नसांनसांमधुनी

मधुर भावनामय चैतन्यें फुलली निमिषांत—
अंतरंगब्रह्मांडमंदिरीं प्रीतीची ज्योत !

नयनीं बघतां मुख-कौमुदिची हास्यमया माया
प्राणकुमुद हृत्सरसीं लागे थयथय नाचाया !

हास्यतेज नाचवी मुखावरि छटा गुलाबाची
जणूं विलसली ध्वजाच गालीं नाजुक नवतीची !

गोड गुलाबी गुलाब फुलतां मुखिंच्या उद्यानीं
दरवळला प्रीतीचा सौरभ भौतीं त्यामधुनी

शुक्रचांदणी उज्ज्वल मुखिंची आकर्षणमाया—
पसरुनि, तेजें झुलवी, डुलवी अंतरंगदुनिया !

दिव्य गुणांनीं तुझ्या साजणी ! मन गेलें भुलुनी
तुझ्या प्रीतिचा, तुझ्या मूर्तिचा लागे ध्यास मनीं !
नितांत कोमल वृत्ति बघुनि तव खुल्या दिलामधली
दिलादिलामधिं प्रणयभावना जागृत कीं झाली !
हृदयमंदिरीं भरांत पेटे प्रीतीची ज्योत
एकान्ताच्या भयाणतेचें दूर पळे ध्वांत !
प्रणयाच्या जललहरींवरती पोहत स्वच्छंदें—
मोदें असतां दंग, उठति मनिं तरंग त्या छंदें !

तरंग उठतां अंतरंग मम सहज गुंग झालें
मनामनांचें मंगलमय मग मधुमीलन झालें !

प्रणयज्योत नजरेची नवल्या नयनां जों भिडली
तशी निमाली नाजुक लाली गालींच्या गालीं

आणिक आली गोंडस गालीं लाजेची लाली
खुल्या दिलाची खुली वृत्ति मग क्षणांत मावळली !

डोळ्यांआडुनि प्राण बघति हा प्रणयाचा खेळ
बघतां बघतां क्षणांत झाला हृदयांचा मेळ !

किसलयकोमल सहजरम्य तव पाहुनि वदनातें
प्रेमभुकेल्या हृदया येई प्रेमाचें भरतें

रविकिरणांचे खेळ पाहुनी कुसुम जगीं विकसे
तेवीं तव नयनींच्या किरणें हृदयकुसुम विकसे.

इन्दुदर्शनें प्रेमळ सागर प्रेमानें डोले
तेवीं तव वदनेन्दुदर्शनें हृत्सागर डोले !

प्रेमाचा हा प्रेमळ महिमा जग सगळें मानी !
परि अवमानी प्रणयमोहनी मन तव अभिमानी !

व्यर्थ, व्यर्थ जगिं निष्प्रेमाचें जीवन मनुजाचें
व्यर्थ जीवनाविण जसें तें जीवन मीनाचें !

मूर्ति गोजिरी, नजर लाजरी सांठविली नयनीं
नयनीं जमले प्राण, बघाया जीवाची राणी !

नयनींच्या तव प्रणयविलासें जिव झाला लोल.
अर्पितसें मी हार प्रीतिचा तुजला बहुमोल !

हाय ! हाय ! जगिं नीरस हें मम जीवित तुजवीण !
तुजविण जगिं या जगणें आतां मरणासम जाण !
प्रेमापायीं जरि झाले या हृदयाचे तुकडे
ओढ घेइ तरि तुझ्याकडे हें मन माझें वेडें !

जीवन तूं मम जीवनलतिके ! मीन तयांतिल मी !
दैवत तूं, मी दास; सुमन तूं, मधुप तुझा ना मी ?
नयनांचा आनंद, सुखाचा बंध जिवाचा तूं !
प्राण हृदयिंच्या हृदयाचा मम, ज्योत जिवाची तूं ?

इन्दुकला तेजाळ गगनिंची, बिजली तूं नभिंची !
सौंदर्याची, पावित्र्याची खाण सद्गुणांची !
सुधास्यंदिनी चंद्रकला तूं चित्तचकोराची
जगन्मोहिनी राजस राणी हृद्ब्रह्मांडाची ! !

हीनदीन मी ! तुजशीं माझी तुलना कशि व्हावी ?
कशि दीपाची इन्दुकलेशीं बरोबरी व्हावी ?
तरी राजसे ! प्रेमाची ही विनति असे तुजला–
'दोष टाकुनी प्रेमें हृदयीं स्थानचि ते मजला !'

अखंड अनुरागाची गंगा पडतां मजवरती
फुलता होइल जीवनबगिचा उजाड हा जगतीं !
हृदयाची मम नकळत करुनी नाजुकशी चोरी
प्रेमाची मग काय म्हणुनि ही सांग अशी चोरी ?

नकळत हातुनि चूक झालि का ?–विनति तरी तुजला–
'अपराधाची क्षमा गडे ! कर चुकल्या जीवाला.'

पंचप्राणांची पंचारत, पुष्पचि प्रणयाचें
अखंड अश्रूंचें अभिषिंचन, मंत्रपुष्प मनिंचें

यांसह केली जीवेंभावें तुझिया प्रेमाची—
प्राणप्रतिष्ठा हृदयमंदिरीं नाजुक नवलाची !

प्रसन्न होउनि अंतरंगिच्या प्रेमपूजनानें
स्वीकारीं ना भक्तजना या जिवलग भावानें !

अर्पियला तुज अमोल ठेवा पंचप्राणांचा !
करील ना सांभाळ सखे, तव मनराणा त्याचा ?

निर्वाणीचें एक सांगणें अखेर हें तुजला—
" प्रेमें जवळी घे, वा तुडवीं पायदळीं मजला ! "

❁ ❁ ❁

वाहियली ही रानफुलांची माला तव हृदया
स्मृती मनीं तिचि ठेव, गेलि जरि सुकुनी ती वायां !

पेण,
१ जानेवारी १९१९.

# 'भगिनी मम स्वर्गीं गेली' !—

[ चाल—उद्धवा शांतवन०

—१—

ही वार्ता अवचित आली—
'भगिनी मम स्वर्गीं गेली !'
मम कानिं आपदा पडली    थैमान दुःख मनिं घाली
बेभान वृत्ति मम झाली    त्या हृदयविदारक कालीं
जणुं वीज नभीं कडकडली    हृदयावरि जाउनि पडली
दुर्दैवें साधुनि वेळा—
जीवाचा चोळामेळा—
निमिषामधिं एका केला—
हृदयाची तुडवुनि जाळी !    'भगिनी मम स्वर्गीं गेली!'

—२—

जीवाचें फुलतें फूल    बागेंत जगाच्या फुललें
प्रेमजलें खुललें, डुललें    दैवें परि कुसकारियलें
दैवाचा निर्दय खेळ    पाहुनी विश्वही रडलें
मन दुःखावेगें कढुनी
विश्वाच्या नयनांमधुनी
आंसवें दंवाची गळुनी
टपटपां भूवरी पडलीं !    'भगिनी मम स्वर्गीं गेलीं!'

—३—

मनिं अग्नि दैत्य खळबळला !    भगिनिच्या तनूला भिडला
सोडिना मुळीं मग तिजला    सजला तिज चिरडायाला

करुनि नाश कायम पुरता    मग कुठें शांत तो झाला !
अग्निची आसुरी लीला
लाजवील कलिकाळाला !
थिजवील दैत्यहृदयाला !
हृदयाला चरचर जाळी   'भगिनी मम स्वर्गी गेली !'

—४—

जणुं भगिनी-तनुसौंदर्या    पाहुनी अग्नि मनिं भुलला
होउनि कळस मोहाचा    स्पर्शाया तनु तिचि गेला
परि तिच्या सु-कोमल देहा स्पर्श तो सुदुःसह झाला !
परस्पर्श-कलंकित काया !
साहे न कल्पना हृदया !
अजि जीवन अपुलें वाया—
मानुनी असें त्या कालीं    'भगिनी मम स्वर्गी गेली !'

—५—

मम आई तेव्हां गेली    मज सोडुनि शैशवकालीं
" आक्का " ही आतां गेली ! मज कोणि न उरला वाली !
'आणखी काय मम भालीं'?   प्रश्नें या मति मम थिजली !
हा कर्माचा का भोग ?
कां जिवासि हा उद्वेग ?
दुःखाची जळती आग—
जड, जळत्या जीवा जाळी ! 'भगिनी मम स्वर्गी गेली !'

—६—

मी हीन दीन, हतभागी    जगताच्या भटकें रानीं !
अंधार पसरला भौंतीं    वृत्ति होय वेड्यावाणी !

मज मायेचा ममतेचा     आधार नाहिं का कोणी ?
अति विमल बंधु-प्रेमाला—
निर्व्याज तात-प्रेमाला—
सुमस्निग्ध नाथ-प्रेमाला—
विसरुनी सकल त्या कालीं 'भागिनी मम स्वर्गी गेली !'

—७—

अग्नीची दारुण लीला     भागिनिला सुखद परि होई !
भागिनी मम येथुनि जाई     आनंदें स्वर्गी राही !
आनंद भूवरी नाहीं     उपजवी शांति जो हृदयीं !
"या पापपूर्ण जगताचा
मुळिं नको वास दुःखाचा !"—
हा असे हेतु तन्मनिंचा !
म्हणुनीच जणूं त्या कालीं     'भागिनी मम स्वर्गी गेली !'

—८—

जड देह टाकुनी जळता     अविनाशि जगतिं ती जाई !
अति निर्मल निज हृदयींचें     प्रेम ती तेथुनी वाही !
सहवाससुखें स्वर्गाच्या     आनंद पाझरे हृदयीं
तेज जें नभीं तारांचें
दृश्यरूप त्या मोदाचें
बघुनि हें सहज मन नाचे !
हृदयशांति परि नच झाली !     'भागिनी मम स्वर्गी गेली !'

—९—

हें मरण नव्हे भागिनीचें !     मरण हें असे मरणाचें ! !
मरणाच्या दुर्घट वाटे     जिव मिळवी सुख स्वर्गीचें !

जीवांचें जगणें मरणें केवळ तें फळ कर्माचें !
जडतेची झाली माती !
मातीस मिळाली माती ! !
परि दिव्य चेतना जळती—
मूळपदीं तन्मय विरली ! ! ! 'भगिनी मम स्वर्गीं गेली !'

—१०—

दुःख, त्रास, नैराश्याला कायमचें आलें मरण !
चिर सौख्यशांतिचा, जन्म झाला या मरणांतून ! !
यापरी अंतिं हें मरण आहे चिरशांतिस्थान ! !
हृदयाचें होउनि पाणी
कां येतें नयनीं पाणी ?
तें ईश एकची जाणी !
मति मायामोहें झुकली 'भगिनी मम स्वर्गीं गेली !'

मालवण,
२ एप्रिल १९२१.

# निराशा !—

[ जाति—केशवकरणी

सुरम्य, सविनय प्रणयमुग्ध तव वदनकमल पाहुनी
प्रेमले ! मन गेलें मोहुनी !

हृत्सरिता तव प्रेमें दुथडीं प्रेमजलें वाहुनी
टाकि मम मानसतट व्यापुनी !

" हृदयाचा मृदु करुनि गालिचा नाचवीन मी तुला
नाहिं मम सौख्याला मग तुला !—"

आशेवरि या जीव टांगुनी वाट तुझी पाहिली !
होति परि विधिघटना वेगळी !

जोत्स्नायौवन पाहुनि शीतल रत्नाकर रंगला !
मानसीं प्रेमसुखीं दंगला !

सहवासाची तिचिया साची आस मनीं तो धरी
ना परी झालि कधीं ती पुरी !

कलिका खुलली रविच्या किरणें तद्विरहें कोमली
तयांची भेट न कधिं जाहली !

अनुभव कटुतर हाची अपुल्या प्रेमीं मीं पाहिला !
जीवनीं राम नसे राहिला !

पुणें,
८ डिसेंबर १९२२

## विनंति !—

[ चाल–नृपममता रामावरती.

( १ )

दिन फार तुझ्या भेटीला—
जाहले, जीव हा झुरला । प्रेमले !
तव ध्यानिं निशिदिनीं रमला
तुजविणें विषय त्या नुरला । प्रेमले !
वद पाहुं कुठें मुखकमला
देत जें सौख्य नयनांला । प्रेमले !
अंतरीं–प्रणयमाधुरी–निर्मुनी पुरी–मूक जीवासी
कां आतां व्याकुळ करिशी ? । प्रेमले !

( २ )

मम हृदयकमल दीनाचें
प्रेमाच्या नादीं नाचे । प्रेमले !
नवतिची खुलावट मुखिंची
चेतवी ज्योत जीवाची ! । प्रेमले !
प्रेमाच्या अविरल लहरी—
नाचती हृदयकासारीं ! प्रेमले !
सत्वरीं–हस्त दे करीं–जडविं झडकरी–हृदय हृदयाला
विनति ही असे मम तुजला । प्रेमले !

( ३ )

स्वार्थाच्या या संसारीं
दुःखाचे अनुभव भारी । प्रेमले !

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........ फुलेबाग
ता. ..............

दु:खाच्या पडता दरव
प्रेमाला जिव गोंजारी । प्रेमले !
प्रेमविषय होतां आड
लागतें जिवाला वेड । प्रेमले !
त्यावीण– पांचही प्राण– करुनि हैराण– जाळि जीवाला
प्रीतीची जळती ज्वाला ! । प्रेमले !

( ४ )

दुर जातां वासर-राजा
सृष्टिसती विसरे काजा । आपुल्या !
विरहाच्या दु:खीं म्हणुनी
जणुं घे ती अंगावरुनी । आपुल्या—
अंधुकसा बुरखा काळा
मुखकमला लपवायाला । आपुल्या
हें अतुल– मधुर, विनमोल– प्रेम अति विमल– दावि जगताला
अंतरिंच्या मृदुभावाला । प्रेमले !

( ५ )

जड सृष्टिमधींही दिसती
प्रेमाच्या असल्या रीती । प्रेमले !
विरहानें दु:खीं बुडती
जड जगतीं निर्जिव जाती । प्रेमले !
प्रीतीची नव नवलाई
नवजीवन जगता देई । प्रेमले !
स्वच्छंद– लावुनी छंद–करी बेबंद–जीवजंतूला
प्रीतीची चंचल बाला । प्रेमले !

( ६ )

परि नाहिं तुझ्या हृद्बंधा
प्रीतीची 'मोहनबाधा' । नवल तें !
जे भाव दगडधोंड्यांना
ते जित्या जिवांना कां ना ? । नवल तें !
मग सजीवतेची कां ती–
मानावी मानसिं महती ? । नवल तें !
निशिदिनीं– सखे, सांजणी– प्रेमचिंतनीं– नटावि जीवाला
विनति ही असे मम तुजला । प्रेमले ।

सातारा,
१५ मे १९२३.

# हृदयाची कबुली !—

[ चाल—असार जीवित केवळ माया०

प्रेमाच्या बाजारीं जिव हा भटक भटकला दीनाचा
अखेर पटला सौदा सखिच्या नाजुक निर्मल प्रेमाचा !
नैराश्याच्या अंधारामधिं नव्हती आशा सौख्याची
प्रीतीच्या मृदु इन्दुकरांनीं वाट दाविली परि त्याची !
नैराश्याची निशा संपली ! उषा उगवली सौख्याची !
राम जीवनीं दावुनि सखिनें कळी फुलविली जीवाची !
प्रेमाचे बहु खेळ मजेचे सुखविति सहजचि जीवाला
नवरंगीं प्रेमाच्या नटला जीव विसरला जगताला !
मना मोहवी मधुर मोहनी मुक्या मनाच्या मौजेची
छेडुं लागली गान मधुर मग सतार खुलल्या हृदयाची !
लाखाच्या मोलाचा सखिचा बोल बोलवी जीवाला
हलवी तारा हृदयाच्या मग जीव मिळाला जीवाला
गुंफलि हळुहळु निजप्रीतीच्या माणिक-मोत्यांची माला
अंतरंगिंचे भाव उघडुनी अर्पिलि पंचप्राणाला !
करुनि जागता जीव जगाला धडा ठसविला मनावरी—
आधिं 'निराशा', पुढें सुखाशा; असे यांतची मौज खरी !

मुंबई—फोर्ट,
२ जुलई १९२३.

# "देशभक्त शंकरराव"—

[ चाल—उद्धवा शांतवन०

कानांवरि येउनि पडला आनंदघोष हा कसला ?

दशदिशा, बालबालाही आनंदें नटलीं सारीं
आनंदवारि तें वाही नरनारी-हृत्कासारीं
कां सारी दिनदुनिया ही आनंदस्रोत हा पसरी ?
गगनींचा राजस राणा
घेउनी सवें निजकिरणां
हर्षाची पसरुनि जमुना
आनंदवि भू-गगनाला ! आनंदघोष हा कसला ?

पुत्रवीर 'सावित्री'चा वीरपुत्र भू-मातेचा !
अभिमानी निजभूमीचा कैवारी शुभ काजाचा
चेला जो गांधीजींचा सत्याग्रह-शाहिर साचा
रणमर्द शूर शीपाई
सत्याग्रहकाजापायीं
कारागृहवासीं जाई
तोडुनी मोहपाशाला आनंदघोष हा कसला ?

कैदेमधिं 'येरोड्या'च्या तिन मास देह झिजवीला
मिठ-भाकरतुकड्यावरती जागता जीव ठेवीला
दगडाची करुनी शय्या करितसे वरी शयनाला

शृंखलाबद्ध हस्तानें
जणुं करुनि नमन प्रेमानें
कारागृहिं आशिर्वचनें—
करि अर्पण भूमातेला          आनंदघोष हा कसला ?

संवर्धन भूमातेचें          संरक्षण निजधर्माचें
हृदयाच्या हृदयाजवळी          गीत हें सदाचें ज्याचें
त्या शूरा 'शंकर' वीरा          नमन तें असो विनयाचें
निज भूमीवरती माया
मंत्र हाचि ठाऊक हृदया
राष्ट्रकार्यिं झिजवुनि काया—
सुयशाचा ध्वज फडकविला          आणि वीर गृहा हा आला !

सातारा–कँप,
२४ ऑगस्ट १९२३.

# प्रेमाची तात्त्विकता !—

[ चाल—असार जीवित केवळ माया.

हृद्याच्या गिरिशिखरावरुनी निर्झर निर्मल प्रेमाचा
अखंड झुळझुळ वाहुनि फुलवी पंचप्राणाचा बगिचा !

अतुल, विमल जगिं प्रीतसलिल हें उमलवि उज्ज्वल हृत्कमल
परिमल निर्मल, कोमल त्यांतिल खुलवि सकलही भूमितल !

प्रेमजलें परि फुलोनि भौंतीं परिमल निर्मल जों पसरी
चंडवातसंपात अचानक तोंच तयाला कुसकारी !

मेघव्याप्त अंतराळिं जैशी बिजली तेजें चमकावी
क्षणभर चमकुनि क्षणांत तेथिल भयाण भीषणता दावी !—

भावभावनाव्याप्त अंतरीं प्रीत तशी चमके न्यारी !
भीषण नैराश्यानें व्यापी अंतरंग-जाळी सारी

अखेर मग अंतराळ जैसें भळभळ जलसिंचन करतें
तेवीं जड दुःखाश्रु गाळणें जीवाच्या नशिबीं येतें !

क्षण हंसवी, क्षण रडवी चंचल प्रीतबालिकेचा चाळा !
सुखशिखरीं क्षण नेउनि लोटी दुःखदरीमधिं अखेरिला !

जगिं प्रेमाची आशा हृदया लावी आशेचें प्रेम !
आग लावुनी दैव पेटवी परि आशांचा त्या होम !

# दैव !—

[ जाति—मोहिनी.

अजब नयन-जादूगिरिनें भारुनी मनास
व्यर्थ, व्यर्थ जीवाला या भुरळ पाडलीस !

छेडुनियां हृदयामधल्या भावसतारीस
मंजुळसे प्रीतीचे तूं नाद काढिलेस !

मुग्ध, मधुर त्या वेळे तव हृदय करी चाळे !
काळ वेळ नाहीं ना तूं पाहिलीस बाळे ?

वेळ परी आतां तुजला पळभरहि मिळेना—
शब्द एक बोलायाला; मुखहि तव दिसेना !

फरक असा वृत्तीमाजी कां तुझ्या पडावा ?
काय असें पाप घडे तें हातुनियां देवा ?

हृदयिं मान ठेवुनि प्रेमें तूंच जिवलगे ना—
पुसलिस मज आतुरतेनें—'आपुलीच मी ना ?"

"होय" म्हणत हंसुनी बघतां गोड मुख तुझें तें—
हांसलीस लाजुनि तूंही !—आठवतें का तें ?

जाणिवही बाळे ! आतां त्याचि तुला नाहीं !
जाणिव परि निर्दय मज ही बुडवि दुःखडोहीं !

प्रीतबहर कायमचा तो ओसरला आज
पायदळीं तुडवुनि कशि तूं गेलिस मन-सरोज ?

नशिबानें हातीं आलें फूल गुलाबाचें !—
आभारचि मानित होतों मनीं सुदैवाचे !

परी कुणी हिसकावुनि तें दूर दूर नेलें !
कांटे परि देवा आतां हातिं राहियेले !

नशिबानें होतें तव जें तेवढें मिळालें—
हिणवीतां दैव असें, मम हृदय रडे भोळें !

पुणें,
२३ नोव्हेंबर १९२९.

# जातिवंत फुलें !—

[ जाति–शार्दूलविक्रीडित

बाला सुंदर कोणि एक विहरे बागेंत एकीकडे–
भावोद्दीपित मानसीं तरळती प्रीती जशी बागडे !
सारीं चित्रविचित्र नाजुक फुलें, सौंदर्यही तेथलें–
पाहोनी हलुवार मानस तिचें आनंदलें, मोहलें

सहजीं तों बघुनी गुलाब-सुमनें आकृष्ट ती जाहली
जावोनी जवळी हळूच खुडुनी हातीं तिनें घेतलीं
आला तों इतुक्यांत हांसत तिथें स्वामी जिवाचा तिच्या
पाहोनीच परस्परांस, खुलल्या वृत्तीहि त्याच्या तिच्या !

वेगें प्रीतिभरांत मान अपुली वक्षःस्थळीं ठेवुनी
बिलगोनी हृदयास घट्ट, भिडवी डोळ्यास डोळा झणीं
आणी त्यास वदे,–" फुलें प्रियकरा ! घ्या ना गडे दोन हीं"
" घे तीं तूंच तुला, सखे ! "–वदतसे–" मातें नको एकही ! "

ऐकोनी कटु जीवितेशवच हें झाली मनीं खिन्न ती !
दुःखानें निमिषांत अश्रु गळले डोळ्यांतुनी खालतीं !
घेवोनी जवळी तिला, पुसतसे डोळे तिचे सारखे
आणी तो वदला–" कळे न तुजला थट्टाहि का लाडके ?"

लाजेनें फुलती गुलाब-सुमनें गालीं तुझ्या दोन जीं
प्रेमें तीं सखये बहाल कर ना जीवास त्याऐवजीं "
ऐकोनी अनुरागपूर्ण वच हें बाला मनीं लाजली
आणी गोड गुलाब गालिं फुलतां शोभा मुखीं फांकली

चुंबोनी सखिच्या गुलाब मुखिंचे हृदयांतरीं साठवी
" जातीवंत फुलें"–वदे–" त्यजुनि हीं कोणा दुजीं तीं हवीं ?"

पुणें,
२९ नोव्हेंबर १९२९.

## दुःखांत सुख!—

[ चाल– तो भासच सगळा जरी.

लवलेश सुखाचा नसे
        दैव तें हंसे
            तरि गीत गोडसें हृदय कसें गातसे ?

घनघोर माजलीं रणें!
        व्यर्थ हांसणें!
            तरि मनांत खेळे आशेचें चांदणें!

तळमळे जीव जरि मनीं—
        खिन्न होउनी
            तरि प्रसन्न करि त्या प्रीतनादमोहनी!

तम पसरे गगनांगणीं,
        दिसेना कुणी,
            तरि जिवास सुखवी शुक्राची चांदणी

हे बघुनी भीषण कडे—
        जीव जरि अडे,
            मन गढे तेथल्या बघुनि निर्झरांकडे

शुकशुकाट चोहींकडे,
        आयु कोरडें,
            तरि तरंग फुलते मनीं राहती खडे

हे कांटे जेथें तिथें—
तीक्ष्ण भोंवते !
तरि गुलाबफुल तें आंतुनि डोकावतें !

सारखी निराशा हंसे !
लागलें पिसें !
तरि मनीं उमटले तत्त्वाचे ते ठसे !

पुणें,
२ डिसेंबर १९२९.

## धांवा !—

[ चाल—ख्वाजाके कलसे मै तो०;
( राग—पिलू )

( १ )

प्रीतीच्या जिवाला देवा । कुठें पाहुं आतां ? ॥ कुठें० ॥
भागलें शोधतां ॥ ध्रु० ॥
मनाची हांव ही—विरावें अंतरंगांत—
कळाया मोहना मनिंचें रे प्रीतइंगीत ॥ कुठें० ॥

( २ )

जिवाला विसांवा माझ्या । तुझ्याविण जीवा—॥ तुझ्या० ॥
जगीं कां नसावा ? ॥ ध्रु० ॥
जगाचीं बंधनें तोडुनी, सोडुनी लाज—
जाहलें सुंदरा ! खुषिनें रे मी तुझी आज ! ॥ कुठें० ॥

( ३ )

अंधारीं प्रकाश तूं रे ! । आधार जगांत ! ॥ आधार० ॥
नको पाहुं अंत ॥ ध्रु० ॥
गुंतला जीव हा प्रीतिच्या मोहपाशांत,
सुटाया त्यांतुनी बळ ना या क्षीण जीवांत ॥ कुठें० ॥

( ४ )

बांधीलें मंदीर, आतां । झालें मोलहीन—॥ झालें० ॥
तुझ्या मूर्तिविण ! ॥ ध्रु० ॥
भुकेला जीव हा मुखींचे बोल ऐकाया
पुरेना वंचना, तुजला रे कशी ना माया ? ॥ कुठें० ॥

पुणें,
१६ फेब्रुवारी १९३२.

# नवलाची मुशाफरी !—

[ जाति—चालानन्द

काळ चालला झराझरा    करा अतां तरि त्वरा जरा
भराभरा पाउल टाका    चाहुल लागूं देउं नका
श्रद्धा, हिंमत मनीं धरा    आणि 'मुशाफरि' सुरू करा
पिता, बंधु, माता, कांता    विसरा तीं नातीं आतां
तुडवुन ऐहिक अंधारा    जीवन बंधनमुक्त करा !
जन्माआधीं सुरवात    मेल्यावरहि न ज्या अंत
नवलपरी ही 'मुशाफरी'    मरेतोंवरि करा तरी !
'मुशाफरी'च्या टोंकाला    जाया वेळ नसे उरला
नेटाची परि सुरवात    करणें तुमच्या हातांत !

समतेची, नवनीतीची    तात्त्विकतेच्या ढोंगाची—
आणि कलाजीवन याची    पुरे करा पोपटपंची !
गरिबजनांचीं, मजुरांचीं    गाणीं ठराविक सांच्याचीं—
गाउं नका; किंवा धनिकां    शिव्याशापही देउं नका !
सत्य त्यांत अर्धेंच असे !—    पूर्ण सत्य वेगळें असे !
टाकुनि हीं ढोंगेंसोंगें    चला पाय उचला वेगें
घेउनि अनुभव वाटाड्या    विश्वलढ्यामधिं घ्याच उड्या !
विचार जगण्यामरण्याचा    लेचापेचा जो त्याचा !
कितीक ते जगती, मरती !    करती त्यांची कोण क्षिती ?
झुंजा, मारा, जगा, मरा    परि तेजाची कृती करा !

मेल्या जीवाला जगवा मार्ग दाउनी अमर नवा !

❀ ❀ ❀

तेजांतुन जन्मा आलां ! मरतां मिळतां तेजाला !
दावा ते तेजःकिरण जीवनअभ्राआडून !
अज्ञानांधारांतून मार्ग करूनी आक्रमण—
अभिनव तेजाचे किरण अखेर काढा हुडकून !
नीच, गरिब, श्रीमंत असो कुल, विद्या त्या असो नसो
तेजाच्या मार्गें जाया तळमळ खरि ज्यांच्या हृदया
अशांस घेउनि बरोबरी निघा कराया 'मुशाफरी' !

पुणें,
५ फेब्रुवारी १९३५.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५५७०

# “ तुझ्यासाठीं ! ”—

[ जाति–भूपतीवैभव

या कळ्या उमलल्या जीवनवेलीवरल्या—
फुलवाया बागा तुझ्या जीवनामधल्या !

घेतील हातिं कुणि पायदळीं जरि पडल्या !
कुणि देतिल फेंकुनि हुंगुनि पडल्यापडल्या !

क्षिति नसे जगाच्या स्तुतिनिंदेची त्यांना !
फुलतात भुलुनि तव नयनींच्या किरणांना !
तूं येतां त्यांचीं पानें–हालती !
तूं बघतां, त्यांतुनि सुमनें–उगवती !
दशदिशांस निजगंधानें–भारती !
कापूसपुंजका हले जसा झुळुकेनें !—
कळि, कळी, वेल तशि हले तुझ्या स्पर्शानें !

चैतन्य त्यांस तूं ! शून्य विश्व तुजवीण !
तुजसाठीं उमलुन जातिल कोमेजून !

त्यां भीती नाहीं अग्नीवर्षावाची !
तशि शस्त्रास्त्रांची, किंवा कळिकाळाची !

पण रोष तुझा जर कधिं त्यांवर होईल
मातींत मिळुनि तीं मातीमय होतील !

तुजसाठीं जन्मा आल्या—या कळ्या!
जरि दिसल्या, किंवा असल्या—कोंवळ्या—
तुजसाठिं उघडतिल मिटल्या—पाकळ्या!

क्षण एक म्हणुनि तूं टाक नजर त्यांवरती
मग कळेल तुज, कां तुजसाठीं त्या फुलती!

पुणें,
११ फेब्रुवारी १९३५.

# चेतना !—

[ गज्जल—श्यामला

अंधार हा भौंतालचा कांहीं दिसूं देईचना !
सामोरि ये स्वर्सुंदरी ! तेजें झुलव नयना—मना !

आभासमय हीं जीवनें विरतील कीं आतां, उद्यां !
तव चारुता, स्वर्गीयता परि दिव्य तीं ! त्या अंत ना !

ती दिव्यता स्वप्नांतली दिसणार का जागेपणीं ?
हातांतली किरणावली लाभेल का हाता कुणा ?

दिव्यांश ती तेजस्विता जी अंतरा सहजीं कळे !
लावूनियां हुरहूर त्या आंदोलवी नव भावना !

हृदयांतल्या फुलपाकळ्या तेजामधीं तव नाहल्या !
हव्यास परि त्यां लागला तव शोभवावें जीवना !

वाहते ही जीवगंगा दिव्यता-गिरि-शिखरांतुनी !
जीवनाच्या पायथ्याशीं तो दिव्यतागुण राहिना !

तव दर्शनें या जीवनीं स्मरतांच मग ती दिव्यता—
बघ लाभली निमिषामधीं जड जीवना या चेतना !

पुणें,
१४ फेब्रुवारी १९३५.

# अज्ञात !—

[ चाल–तखे मी मुरारी०
(राग––भीमपलास०)

कुठें एक क्षण मीं तुला पाहिलें !—
अन् मी अशी कां हि भांबावलें ?

तुला कीर्ति अन् वैभवें लाभलीं !
तव नेत्रिं त्याची प्रभा फांकली !
त्या नेत्रजादूंत मी रंगलें ! ॥ कुठें० ॥

तुझ्या दिव्य गानीं रमे विश्ववाणी !
गाती तुला कीर्ति-गीतें कुणी !
त्या गीतनादें मना जिंकिलें ! ॥ कुठें० ॥

तुझ्यावीण शोभा नसे जीवना !
तुजवीण बेचैन वाटे मना !
सर्वस्व कीं मीं तुला वाहिलें ! ॥ कुठें० ॥

रमे जीव माझा तुझ्या पूजनीं !
खेळे तुझी मूर्ति ध्यानींमनीं !
अज्ञात परि मी तुला राहिलें ! ॥ कुठें० ॥

पुणें,
२१ फेब्रुवारी १९३५.

# सारंगी—

[ जाति—प्रणयप्रभा०

लाभली आज ही सारंगी    सुरनाद जिचे नानारंगी !
बहिरंग नसे डौलदारसें    मग अंतरंग कळणार कसें ?
परि रसिकजोड लाभतां तिला  गुंगवी गोड तिचि स्वरमाला !
वायुविना फुलवास कळेना !
कंपनाविना नाद निघेना !
विनाचेतना भाव स्फुरेना !
हृद्गीत तसें सारंगिविणा    नाकळे खरोखर जगीं कुणा !

भरदार तान ना हृद्गाना    डोलवील जग का मग माना ?
थरथरे जीव हा गातांना    जीवनास मग ये न्यूनपणा !
असंख्य लहरी जलाअंतरीं—
दृश्यरूप ना ज्यां बाहेरी
वायुस्पर्श परि प्रगट त्यां करी !
प्रगटले मनोगत भाव तसे    सारंगिगीतनादासरसें !

पुणें,
२६ फेब्रुवारी १९३५.

# ‘ कां ’ ?—

[ सुनीत

कोठें निर्जन जागिं ते पसरले उत्तुंग काळे कडे
ज्यांमाजी पशु, पक्षि हिंस्र फिरती भक्ष्यार्थ रात्रंदिन !
रोखूनी टंवकारिती स्थिरपणें भौंतालचें विश्व ते !
जैसे पंजरिं व्याघ्र, सिंह टपती भक्ष्यास ‘आ’ वासुनी !

डोळे ताठ करूनि एक क्षणही ना पाहवे त्यांकडे !
होई कावरिबावरी नजर, अन् अंधारि येई जिवा !
घेती त्यावरुनी जलौघ परि ते निःशंक खालीं उड्या !
वाटे काळमिठींतुनी सुटुनि कीं चैतन्य धांवे पुढें !

सृष्टीचें मुख न्याहळीत बसलें नभ तें युगेंच्या युगें !
वात्सल्यें निरखूनियां बघतसे माता जशी बालका !
नक्षत्रें, रवि, चंद्रमा !–किरण हे चैतन्यनेत्रांतले !—
शोभा स्वर्गिय, दिव्य आणिति नभा तेजःप्रभा फांकुनी !

जातां दूर कड्यावरी नजर ती हो जीव कीं घाबरा !—
त्याहूनी परि दूर जें गगन, तें पाहून हो मोद कां ?

पुणें,
१५ मार्च १९३५.

# जाणिव !—

[ चाल–जाके मथुरा०
( राग–झिंजोटी पिलु )

या, या झडकरि या प्रभुराया !—
करा दया सदया ! ॥ या या०

लुलापांगळा जीव आंधळा——
पुरा भाळला देह सुखाला ! ॥ या या०
क्षुद्र किडा मी कर्दमांतला–वर काढा त्यांतून–मजला ! या या०

कलामान मज नसे लाभला !
असे खुळा अभिमान कशाला ? ॥ या या०
अज्ञ मना ना ज्ञानकल्पना !–ज्ञान देउनी पायिं–न्याना ! ॥ या०

सभोंवार अंधार माजला !
जीव त्यांत हा पार बुडाला ! ॥ या या०
प्रकाशमय मज विश्व दाखवा–मिळे जिथें चिरशांति–देवा ! ॥या०

पुरे अबोला दीनदयाळा !
दिव्य गान ऐकवा जिवाला ! ॥ या या०
येउनि चित्ता एकतानता–घडो दिव्यतालाभ–आतां ! ॥ या या०

पुणें,
१७ मार्च १९१५.

# नशिबाचे खेळ !—

[ जाति–दिंडी

कुणी कुजबुजती तिज रोज बघून:—
'लग्न हिजशीं करणार तरी कोण ?'
असे काळीसांवळीं बालिका ती !
नाकिं डोळीं सामान्य अशी होती !

कला, शिक्षण, गुण नसे तिच्या अंगीं !
सुखी होती ती परी अंतरंगीं !
कुणी बाला सुकुमार, गोरिपान
तिच्या घरिं आली पाहुणी म्हणून

गानवादननिष्णात बालिका ती !
कला साऱ्या संपूर्ण तिला येती !
कुणी वदती पाहुनी तिचा झोंक:—
'पत्नि करितिल हिज थोर थोर लोक'

पोर काळी ती झालि अतां राणी !
मोलमजुरी ती करी गौरवर्णी !
वदति पाहुनि हें लोक अतां सारे—
'खेळ नाशिबाचे हेच बरे सारे ! !'

पुणें,
२२ मार्च १९३८.

## श्री महाराष्ट्रगीत—

[ चाल—बहु असोत सुंदर०

शूर महाराष्ट्रा ! हे ! सृष्टिनंदना !—
बद्धांजलि बालक तुज करी वंदना ! ॥ध्रु० ॥

अति मंगल, परमोज्ज्वल तव परंपरा !
पसरो तव कीर्तिप्रभा दिगूदिगंतरा !
थोर, पोर यांची तूं मायमाउली !
तृषित भागल्या जिवांस तूंच सांवली !
निष्क्रिय निज जीवनांस देइं चेतना !
बद्धांजलि बालक तुज करी वंदना ! ॥ १ ॥

शूर वीर सांडि इथें रुधिर, त्यांतुनी—
गडागडावरिल कडा निघे न्हाउनी !
चिरे, दगड, खोरिं, दरी, खिडखिंड ही—
'हरहर' जयघोष दिव्य घुमविं प्रत्यहीं !
शिकवी नामर्द मना मर्द भावना
बद्धांजलि बालक तुज करी वंदना ॥ २ ॥

गगन-श्री-वैभव जशि दिवसयामिनी—
वैभव तव भक्ति, बुद्धि ज्ञानदायिनी
कांटेरी वेष तुझा ! अंतरीं सुधा !
दगडा दे देवपणा तुझी वाक्सुधा !

बळ अमोघ नाहिं कुणा हें तुझ्याविना !
बद्धांजलि बालक तुज करी वंदना ! ॥ ३ ॥

पुत्र तुझे पारंगत राजकारणीं–
साधुसंत सज्ज तुझे धर्मरक्षणीं–
शौर्या रणिं, प्रणया ये बहर मंचकीं !
तुझ्या कलाचातुरिला तुला नाहिं कीं–
भावी दिग्विजया ही पूर्वयोजना !
बद्धांजलि बालक तुज करी वंदना ! ॥ ४ ॥

पुणें,
३१ मार्च १९३५.

# ध्येय ?——

[ वृत्त–तूणक

वंदन हें देवी ! तुज चिदानंददायिनी !
ब्रह्मगोल डोलवी !
जीवभाव नाचवी—
दिव्य मोहिनी तुझीच हे दिगन्तस्वामिनी !
तूंच विश्वजीवना—
चेतना दिलीसना ?
अशक्य जीवधारणा जगीं तुझ्यावांचुनी !
उद्यां, आज लौकिकीं—
श्रेष्ठता मिळेल कीं–
क्षणभंगुर वैभवाचि हांव ना परी मनीं !
अज्ञता, अपूर्णता–
अडथळेच जीविता !
करुनि दूर त्यांसि, लावि गोडि आत्मशोधनीं !
ध्येय एक जीवनीं—
स्फुरे तुजशिं पाहुनी—
विरो देह, आत्मभाव दिव्यमय चिरंतनीं !

पुणें,
९ एप्रिल १९३५.

# ‘ चटकचांदणी ! ’—

[ जाति—केशवकरणी

बघुनि त्या क्षणीं तुला साजणी, जडतामय जीवनीं—
पसरली स्वर्गीय संजीवनी !
क्षणांत एका होय अंतरीं वीज चमकल्यापरी
सुंदरी, अजब तुझी चातुरी !
प्रीत लाजरी फिरे अंतरीं स्मृतिपटलाआडुनी—
चांदणी जशी ढगामागुनी !
एकटा राहुनी निश्चलसा अंगणीं
टक लावुनि बघतां बालपणीं चांदणी
लागली चांदणी—चटक रोज जी मनीं—
‘चटकचांदणी !’ अकस्मात ती होय पुरी यौवनीं—
खरोखर आज तुला पाहुनी !

पुणें,
२१ एप्रिल १९३५.

## ' सुखदुःखहीन जीवन ! '—

[ जाति—शार्दूलविक्रीडित

होतें सौख्य मनास, कांहिं अपुल्या होतां मनासारखें
होतां तेंच मनाविरुद्ध, मन तें दुःखें कुढें सारखें !
कोणा सौख्य, कुणास दुःखचि, कुणा सुखदुःख तें सारखें
दे जीवन सुखदुःखहीन जगतीं देवा ! तुझ्यासारखें !

पुणें,
११ एप्रिल १९३५.

# ईशस्तवन—

[ चाल–हा हा आवो मोहनलाल०;
( राग–मांडजोगिया.)

देना दर्शन विश्वाधार !
तूं सुखसार ! मज आधार उदार ! ॥ दर्शन० ॥
स्थिरचर डुलत असे मोदें, तव तेजानें–
झुले दिगंत ! विश्वापार तव संचार-विहार ! ॥ दर्शन० ॥

पुणें,
१४ एप्रिल १९३५.

# बंडखोरी !—

[ जाति—प्रणयप्रभा

[ माझे वडील बंधु कै० अच्युत बापू हे शुक्रवार, ता. १९ एप्रिल १९३५ रोजीं एकाएकीं दिवंगत झाले! मरणापूर्वीं बरोबर चार दिवस अगोदर म्हणजे सोमवार ता. १५ एप्रिल १९३५ रोजीं त्यांचा आजार बळावला, त्या वेळीं मृत्यूचें भयानक स्वरूप डोळ्यांसमोर धुमाकूळ घालूं लागल्यामुळें जीवन-मरणविषयक विचारांची खळबळ अंतःकरणांत सारखी सुरू झाली; प्रस्तुत कविता त्या विचार-खळबळीची शब्दरूप परिणति होय! ]

श्रीमंत, गरिब, दुर्गुणी, गुणी    हा भेद जगीं केलाच कुणी ?

आभाळांतुनि पाउसपाणी—
सांडुनि, भिजवी डोंगर, धरणी
गटारघाणाहि उपसुनि आणी !
क्षणिं होय गढुळ चिखलावाणी !— हा भेद जगीं केलाच कुणी ?

काळा ठिक्कर, बेढब फत्तर
पायिं तुडवि ज्या क्षुद्र जनावर
बने मंदिरीं मूर्ती सुंदर !—
कां दगड बने अशि मूर्ति गुणी ?  हा भेद जगीं केलाच कुणी ?

शरीर, निर्जिव, चेतोहीन—
आत्म्यासंगें मिळवी जीवन !—
आत्म्याविण परि येतां मरण—
हो निर्जिव तें काष्ठावाणी !    हा भेद जगीं केलाच कुणी ?

सर्वसाक्षि, सर्वज्ञ चेतना !—
माझ्यामधिंही तीच असेना ?
देवपणा मग मज कां येना ?
निर्मिला असा हा देव कुणी ?   हा भेद जगीं केलाच कुणी

पुणें,
१५ एप्रिल १९३५.

REFBK-0005501
REFBK-0005501

# जीवनसमाधि !—

[ चाल—मोरी नाहीं चले०
( भैरवी.)

भ्रांती सारी गळे !— दयाळा ! ॥ ध्रु० ॥
सुखमय जीवन प्रेमें डुले ! ॥ भ्रांती० ॥
फुलल्या जुईजाई—चराचरजीवनकुंजीं !
चिरंजीवन मिळे ! ॥ भ्रांती० ॥

पुणें,
१५ जुलई १९३५.

सर्वसाक्षि, सर्वज्ञ चेतना !—
माझ्यामधिंही तीच असेना ?
देवपणा मग मज कां येना ?
निर्मिला असा हा देव कुणी ?   हा भेद जगीं केलाच कुणी ?

पुणें,
१५ एप्रिल १९३५.

REFBK-0005501
REFBK-0005501

## जीवनसमाधि !—

[ चाल--मोरी नाहीं चले०
( भैरवी.)

भ्रांती सारी गळे !— दयाळा ! ॥ ध्रु० ॥

सुखमय जीवन प्रेमें डुले ! ॥ भ्रांती० ॥

फुलल्या जुईजाई—चराचरजीवनकुंजीं !

चिरंजीवन मिळे ! ॥ भ्रांती० ॥

पुणें,
१५ जुलई १९३५.

## माझें पुढील प्रकाशन—

१ **पुनर्भेट भाग ३ रा** ( २० गोष्टींचा संग्रह )

लेखक—श्री. य. गो. जोशी.

२ **पांढरे ढग** ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )

लेखक—श्री. वि. स. खांडेकर.

३ **हृदय आणि बटाटे** ( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )

श्री. य. गो. जोशी.

४ **आवडत्या गोष्टी** ( स्त्री लेखिकांच्या गोष्टींचा संग्रह )

" इन्दु-कान्त " यांचीं

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें:—

लताकुंज—लघुकथासंग्रह.

हितगुज—भावपत्रांचा संग्रह.